हुजूर दप्तरी ठराव नंबर ९ तारीख ३ डिसेंबर सन १९४१ इसवीनें
मंजूर झालेले

# भोर संस्थान कायदेमंडळाच्या निवडणूकीचे नियम

Bhor State Press

इ. मु. द. ठ. नंबर ९

# दप्तरी ठराव

घटनाकमिटीकडे सोपविलेल्या मुद्यांपैकीं पहिल्या तीन मुद्यावरील रिपोर्टास दप्तरीं ठरावनंबर ४ ता. १ माहे जुलै सन १९४१ इ. नें मंजुरी देण्यांत आली व त्या ठरावांत कमिटीनें पुढील दोन मुद्यावरील आपल्या शिफारसींचा रिपोर्ट शक्य-तों लवकर तयार करून दरबारकडे पाठवावा असें सुचविण्यांत आलें होतें. त्या सूचनेनुसार कमिटीचे चेअरमनकडून ता. २६ माहे ऑक्टोबर सन १९४१ इ. रोजींच्या पत्रासोबत चौथ्या मुद्यासंबंधीं, म्हणजे कायदेमंडळाच्या लोकनियुक्त समासदांच्या, निवडणुकीच्या नियमांची प्रत श्रीमंत सरकार राजेसाहेब यांजकडे आल्यावर सदरविषयीं आलेल्या शिफारसींच्या रिपोर्टाचा विचार होऊन त्यांत खालीं दिलेल्या व इतर किरकोळ दुरुस्त्या करून यासोबत असलेल्या निवडणुकीच्या नियमांस मंजुरी देण्यांत येत आहे.

१ निवडणुकीच्या नियमांत कमिटीनें क्याश अलावन्स पावणाऱ्यांना सामान्य मतदारसंघाचे मतदार होण्याचा अधिकार असावा अशी शिफारस करून, त्या आशयाचा नियम नवीन दाखल केलेला आहे. त्यांना मतदानाचा हक्क दरबारनें दप्तरी ठराव नंबर ४ मध्यें ठेवलेला नाहीं व इतर कोठेंही सामान्य मतदारसंघाकरितां अशी लायकी ठेवण्यांत आलेली नसल्यानें, कमिटीकडून आलेल्या नियमांतील नियम नं. ८ (क) (१) (अ) आणि ८ (क) (२) (अ) हें मंजूर करण्यांत आलेले नाहींत.

२ नियम नं. ३० यास कमिटीनें " मात्र, वेळेच्या पूर्वी पोलिंगस्टेशनमध्यें आलेल्या सर्वांना मतपत्रिका देऊन मतें नोंदण्याची संधि दिली पाहिजे, " असा विशेष नियम घातला आहे. अशा प्रकारचा नियम ब्रिटिश इंडियांतील अगर इतर कोणत्याही संस्थानांतील निवडणुकीसंबंधीच्या प्रचलित नियमांत आढळून येत नाहीं. शिवाय, या नियमानें निवडणुकीचीहि अत्यंत गैरसोय होणार आहे सबब, हा नियम वगळण्यांत आला आहे.

३ कमिटीकडून आलेल्या रिपोर्टांत हरिजन समासद निवडण्यासंबंधीं जी नवीन योजना सुचविण्यांत आलेली आहे, तशी पद्धति कोठेंहि प्रचलित नाहीं. शिवाय, हा प्रश्न हरिजनांच्या हिताचा असल्यानें त्यांच्या पुढाऱ्यांचें मत घेतां त्यांनाहि कमिटीची योजना नापसंत असल्याचें दिसलें. कारण, कमिटीच्या योजनेप्रमाणें निवडणूक करावयाची म्हटल्यास, एका तालुक्यांतील उमेदवारास जास्त मतें मिळून त्याची त्या तालुक्यातर्फे निवडणूक होईल; तर, दुसऱ्या तालुक्यातर्फेचा

उमेदवार वरीलपेक्षां अगदीं कमी मतें मिळूनही, त्या तालुक्याच्या वतीनें निवडून येऊं शकेल. तसेंच, या पांचांनीं आपल्यापैकीं आपसांत एक निवडावयाचा किंवा, तसें न जमल्यास, शेवटीं चिठ्ठ्या टाकून पांच उमेदवारांपैकीं एक निवडावयाचा म्हटलें, तरी या दोन्ही रीतीनेंही प्रसंगीं सर्वांत कमी मतें मिळालेलाच निवडून येण्याचा संभव नाहीं असें नाहीं. तात्पर्य, अशा परिस्थितींत निवडणुकीच्या कामीं कोणासच उत्साह वाटणार नाहीं. उलट त्यामुळें आपसांत मत्सर व द्वेषभाव उत्पन्न होण्याचाच जास्त संभव असल्यानें, कमिटीची योजना सर्वस्वी त्याज्य आहे. त्यापेक्षां दरबारची मूळची योजना बरी आहे असें त्यांच्या बोलण्यांत कळून आल्यानें, कमिटीच्या त्या योजनेस मान्यता देण्यांत आली नाहीं; व दरबारची मूळची योजना कायम करण्यांत आली आहे. याप्रमाणें ठराव करण्यांत येत आहे. त्यास अनुसरून निवडणुकीसंबंधीं सर्व तजवीज करावी.

कमिटीकडून पुढील, म्हणजे पांचव्या, बाबीवरील शिफारसींचा रिपोर्ट दरबारकडे पाठविण्याची शक्य तों लवकर तजवीज व्हावी, असें सुचविण्यांत येत आहे.

हे निवडणुकीचे नियम तयार करण्याच्या कामीं घेतलेल्या परिश्रमाबद्दल दरबार कमिटीचें आभारी आहे.

येणेंप्रमाणें असे. तारीख ३ माहे डिसेंबर सन १९४१ इसवी.

K. V. NAIK

दिवाण, सं. भोर

N. G. Ambekar
V. G. Ranade
कौन्सिलर्स

# भोर संस्थान ( प्रातिनिधिक ) कायदेमंडळाच्या निवडणुकीबाबत व नेमणुकीबाबत नियम.

## प्रास्ताविक

१ (अ) या नियमांस भोर संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या सभासदांच्या निवडणुकीचे व नेमणुकीचे नियम असें ह्मटलें जाईल.

(आ) हे नियम ता. १ माहे डिसेंबर सन १९४१ इ. पासून अंमलांत येतील.

२ या नियमांत विषयाला अगर संदर्भाला बाध येत नसेल तर,

(अ) 'दी ॲक्ट अथवा कायदा' ह्मणजे भोर संस्थानच्या राज्यव्यवस्थेबाबतचा सन १९३२ इसवीचा ॲक्ट अगर कायदा नंबर १ असें समजलें जाईल.

(आ) 'मंडळ' ह्मणजे भोर संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ असें समजावयाचें आहे.

(इ) 'लांचलुचपतीचें कृत्य' ह्मणजे परिशिष्ट २ यांतील कलमांखालीं येणारीं लांचलुचपतीची कृत्यें होत.

(ई) 'ग्याझेट' ह्मणजे भोर संस्थानचें ग्याझेट होय.

(उ) 'भोर संस्थानचा प्रजाजन' ह्मणजे संस्थानांत स्थावर मिळकत (जमीन) असणारा अथवा भोर संस्थानांत नित्य अथवा वरचेवर येऊन राहणारा, अथवा भोर संस्थानांत त्याचें घराण्याचें राहतें घर असून त्यांत तो वरचेवर येऊन राहणारा; अथवा निवडणुकीच्या याद्या प्रसिद्ध होण्याच्या तारखेपूर्वी ६ महिने आधिपासून असलेलें, राहण्यास योग्य असें, घर ( तें त्याच्या मालकीचें नसलें, तरी चालेल ) संस्थानांत असून त्यांत वरचेवर येऊन राहणारा असा इसम.

**टीपः—** तारीख १ जुलै सन १९४१ च्या दप्तरी ठराव नंबर ४ चे पान ५ वर शेवटचे ओळींत 'रहिवाशी' हा शद्ब 'प्रजाजन' या अर्थानें वापरलेला आहे, असें समजावें.

(ऊ) 'परिशिष्ट' ह्मणजे या नियमांस जोडलेलें परिशिष्ट.

( ऋ ) ' सामान्य मतदारसंघ ' ह्मणजे १ पहिल्या परिशिष्टांत निर्देशिलेला ग्रामीण व नागर मतदारसंघ.

( क ) ' विशिष्ट मतदारसंघ ' ह्मणजे पहिल्या परिशिष्टांत निर्देशिलेला इनाम-दारांचा विशिष्ट मतदारसंघ.

( ख ) ' संयुक्त मतदारसंघ ' ह्मणजे पहिल्या परिशिष्टांतील हरिजनाकरितां ठेवण्यांत आलेला सर्व संस्थानचा संयुक्त मतदारसंघ.

( ग ) ' मागसलेले ' या वर्गांत महार, चांभार, मांग, भंगी व ढोर हे अस्पृश्य आणि रामोशी, ठाकूर, कातकरी, ह्मसके धनगर, व गवळी धनगर या स्पृश्य जाती समजाव्या.

( घ ) ' सरकारी नोकर ' या शद्बांत संस्थानांतील सरकारकडील व लोकलबोर्ड, म्युनीसिपालिटी आणि नोटीफाइड एरिया कमिटी या संस्थांकडील नोकर समजावे.

**टीपः—** १ सरकारी पेन्शनर, सरकारी कॉन्ट्रॅक्टर, गव्हर्मेंट प्लीडर व पब्लिक प्रासिक्यूटर यांचा सरकारी नोकरांत समावेश होत नाहीं.

( ड ) ' इनामदार ' या शब्दांत संस्थानांतील इनामदार, इसाफतदार, दुमालदार, शराकतदार, हक्कदार, वतनदार आणि क्याश अलावन्सवाले [रोख रक्कम सरकारी खजिन्यांतून पावणारे ] या सर्वांचा समावेश होतो.

[च] ' मालमत्तेची लायकी ' ह्मणजे भोर संस्थानांत असलेल्या जमिनीचा शेतसारा भरणें, अगर घरमालक अगर भाडेकरी असणें, अगर धनगर-महाल अगर मोहतर्फा हे कर भरणें, आणि म्युनिसिपालिटीचें कर भरणें होय.

[छ] ' मतदार ' ह्मणजे मतदारांच्या यादींत ज्याचें नांवदाखल केलें आहे, असा इसम.

[ज] ' मतदारांची यादी ' ह्मणजे यापुढें दिलेल्या नियमान्वयें करण्यांत आलेली मतदारांची यादी.

## भाग पहिला

## मतदारसंघ

३ लोकनियुक्त सभासद हे पहिल्या परिशिष्टांत दर्शविलेल्या मतदार-संघाकडून निवडले जातील आणि प्रत्येक मतदार-संघाकडून निवडण्यांत येणाऱ्या सभासदांची संख्या, त्या त्या मतदारसंघापुढें नमूद केलेल्या संख्येइतकी राहील.

मतदारसंघ

## भाग दुसरा

## उमेदवाराची लायकी व नालायकी

४ [१] खालील इसमांना कायदेमंडळाच्या निवडणुकीस उभे राहतां येणार नाहीं :

उमेदवारांच्या नालायकी

(अ) सरकारी नोकर;

(आ) योग्य कोर्टानें भ्रमिष्ट ( Unsound Mind ) ठरविलेला;

(इ) कोर्टानें ऋणमुक्त न ठरविलेला नादार ( Undischarged insolvant );

(ई) वयाचीं ३० तीस वर्षे पुरीं झालीं नसलेला.

(ऊ) मराठी अगर इतर कोणत्याही देशी भाषेची ४ थी इयत्ता पास अगर तितक्या मगदुराचें शिक्षण न झालेला;

मात्र, अशिक्षित पण व्यवहारचतुर, कर्तबगार व हुषार असलेल्या इसमाच्या बाबतींत ही नालायकी दूर करण्याचा अधिकार श्रीमंत सरकार राजेसाहेब यांना राहील.

(ऊ) भोर संस्थानांतील अगर ब्रिटिश इंडियांतील फौजदारी कोर्टाकडून काळे पाण्याची अगर दोन वर्षांहून कमी नाहीं, इतक्या मुदतीची शिक्षा होऊन ती भोगून झाल्यावर अगर, शिक्षेच्या मुदतीपूर्वी सोडलें असेल, तर त्या दिवसापासून पांच

वर्षांची मुदत पुरी झाली नसलेला, अगर श्रीमंत राजेसाहेब ठरवितील तितकी पांच वर्षांपेक्षां कमी मुदत पुरी न झालेला;

मात्र, ही नालायकीची पांच वर्षांची मुदत कमी करण्याचा अधिकार श्रीमंत सरकार राजेसाहेब यांना आहे.

(ऋ) इंडियन पिनल कोड चॅप्टर ९ (अ) अन्वयें कोणाहि इसमावर गुन्ह्याची शाबिती झाली असेल, अगर डि. जज्ज्यानें निवडणुकी-संबंधीं लांचलुचपतच्या कृत्यांबद्दल चौकशी करून तो इसम दोषी असल्याचा रिपोर्ट केला असेल, तर ही नालायकी शिक्षा भोगून पुरी झाल्यानंतर अगर, त्याची त्या मुदतीपूर्वी सुटका झाल्यास, त्या तारखेपासून अगर डि. जज्ज्याचे रिपोर्टाचे तारखेपासून पांच वर्षेंपर्यंत अमलांत राहील

(ऌ) योग्य कार्टानें वकिली करण्यास मनाई केलेला;

टीपः— मात्र, वरील (ऋ) व (ऌ) यांतील अनुक्रमें नालायकीची मुदत व नालायकी श्रीमंत सरकार राजेसाहेब यांना कमी अगर दूर करतां येईल.

५ विशिष्ट, ग्रामीण व नागर मतदारसंघ, यांतील जागासाठीं उभे राहणारे उमेदवार त्या त्या संघांतील मतदार नसतील, तर त्यास त्या संघातर्फे निवडणुकीस उभें राहतां येणार नाहीं.

६ संयुक्त मतदारसंघातर्फे उभा राहणारा इसम हरिजन नसल्यास, त्यास त्या संघातर्फे उमेदवार म्हणून उभा राहतां येणार नाहीं.

७ कोणत्याहि इसमास एकाहून अधिक मतदारसंघातर्फे उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे राहतां येणार नाहीं.

## भाग तिसरा

# मतदाराची लायकी व नालायकी

८ ज्या इसमास एखाद्या मतदारसंघाचा मतदार म्हणून, या नियमाच्या खालील पोटनियम (अ) अन्वयें नालायकी नसेल आणि (ब), (क) अगर (ड) अन्वयें

लायकी असेल, त्यास मतदारसंघाच्या यादींत आपलें नांव नोंदवून घेण्याचा हक्क आहे.

(अ) मतदार होण्यास अपात्र असलेले इसम:

मतदाराची नालायकी

(१) भोर संस्थानचा प्रजाजन नसलेला;

(२) भ्रमिष्ट असल्याचें लायक कोर्टानें ठरविलेला;

(३) वयाची २१ एकवीस वर्षे पुरीं न झालेला;

(४) लायक कोर्टाकडून झालेली कैदेची शिक्षा भोगीत असलेला; (शिक्षा भोगीत असेपर्यंत त्यास मतदार होतां येणार नाहीं.)

(५) इंडियन पिनल कोड चॅप्टर ९ (अ) अन्वयें कोणाहि एखाद्या इसमावर गुन्ह्याची शाबिती झाली असेल, तर तो पांच वर्षेपर्यंत मतदार होण्यास नालायक होईल. ही नालायकी शिक्षा भोगून पुरी झाल्यानंतर अगर, त्याची त्या मुदतीपूर्वी सुटका झाल्यास, त्या तारखेपासून पांच वर्षेपर्यंत अमलांत राहील.

मात्र, ही नालायकीची पांच वर्षांची मुदत कमी करण्याचा अधिकार श्रीमंत सरकार राजेसाहेब यांना आहे.

[ब] भोर नागर मतदारसंघाच्या मतदाराची लायकी:

भोर नागर मतदार संघांतील मतदाराची लायकी.

जो कोणी इसम मतदारांची [Pretiminary] प्राथमिक अगर कच्ची यादी प्रसिद्ध होण्याच्या तारखेपूर्वीच्या जून महिन्याच्या पहिल्या तारखेस भोर नागर मतदारसंघाच्या स्थलसीमेंत खालीं दिलेल्या [१] ते [९] पैकीं कोणतीहि निदान एक लायकी धारण करीत असेल अगर [१०] ते [१५] पैकीं कोणतीहि निदान एक लायकी शेवटची अगर पक्की [Final] यादी प्रसिद्ध करण्याच्या वेळीं धारण करीत असेल, त्यास मतदानाचा हक्क राहील.

मालक या नात्यानें

१ एक १ रुपयाहून कमी नाहीं, इतकी घरपट्टी भरणारा;

२ चार ४ रुपयांहून कमी नाहीं, इतकी पाणीपट्टी भरणारा; (सवलत म्हणून ज्यास पाणीपट्टीचें रुपये दोन २ द्यावें लागतात, त्यांना मतदानाचा हक्क राहील ).

३ तीन ३ रुपयांहून कमी नाहीं, इतकी भंगीपट्टी भरणारा;

४ चोवीस २४ रुपयांहून कमी नाहीं, इतकें घरभाडें भरणारा, यांस मतदानाचा हक्क राहील. तसेंच—

५ एक १ रुपयांहून कमी नाहीं, इतका मोहतर्फा भरणारा;

६ दरमहा रुपये १५ पेक्षां कमी नाहीं, इतका पगार असलेला सरकारी नोकर;

७ दरमहा रुपये ७॥ साडेसातपेक्षां कमी नाहीं, इतके सरकारी पेन्शन पावणारा;

८ काम करणारा पाटील व कुलकर्णी.

९ भोरच्या म्युनिसिपल हद्दींत,

[अ] दरसाल रुपये १५ पेक्षां कमी नाहीं इतका सारा देणारा;

[ब] दरसाल रुपये शंभर १०० पेक्षां कमी नाहीं इतका खंड देणारा;

**टीपः—** भोर नागर मतदारसंघांतील मागासलेल्या जातींसाठीं मालमत्तेच्या लायकीचें प्रमाण इतरांच्या निम्में राहील.

१० मॅट्रिक्युलेशन, स्कूलफायनल अगर मराठी सातवीची परीक्षा पास झालेला.

**टीपः—** मागसलेल्या जातींसाठीं व स्त्रियांसाठीं शिक्षणाचें प्रमाण मराठी ४ थी इयत्ता पास अगर तितक्या मगदुराचें शिक्षण झालेलें असणें, येवढेंच राहील.

११ संस्थानची सनद धारण करणारा वकील;

१२ संस्थान सरकार किंवा ब्रिटिश सरकार यांजकडून मिळालेला किताब धारण करणारा;

१३ जमेसर;

१४ ऑनररी मॅजिस्ट्रेट;

१५ संस्थानचे सरदार, दरकदार अगर मानकरी;

**[क] ग्रामीण मतदारसंघांतील मतदाराच्या लायकीच्या अटी.**

**ग्रामीण मतदार संघाच्या मतदाराच्या लायकीच्या अटी**

जो कोणी इसम मतदारांची प्राथमिक यादी प्रसिद्ध झाल्या-तारखेपूर्वीच्या जून महिन्याच्या पहिल्या तारखेस संस्थानच्या पांच तालुक्यांच्या ग्रामीण मतदारसंघाच्या स्थलसीमेंत खालील लायकी धारण करणारा असेल, त्यास मताधिकार राहील.

१ खाली दिलेल्या आकाराची खालसा अगर इनाम अगर दोन्ही प्रकारची जमीन धारण करणारा:

विचित्रगड तालुका

(अ) शिरवळ विभाग— ८ रु. [ परिशिष्ट तीन यांत दिलेल्या यादींतील गांवे. ]

(आ) उत्रवली व अंबवडे विभाग—६ रु. ( ,, ,, )

(इ) हिर्डोशी भाग— ४ रु. ( ,, ,, )

राजगड तालुका

(अ) शिवगंगानदीच्या पूर्वेकडील भाग—८ रु. ( ,, ,, )

(आ) ,, पश्चिमेकडील भाग—४ रु. ( ,, ,, )

(इ) वेळवंडखोरे भाग—३ रु. ( ,, ,, )

प्रचंडगड तालुका सर्व—४ रु. ( ,, ,, )

पवनमावळ तालुका सर्व—८ रु. ( ,, ,, )

सुधागड तालुका सर्व—८ रु. ( ,, ,, )

वर उल्लेखिलेले जमीनमालक पोकळ खातेदार नसून जमिनीचे प्रत्यक्ष कबजेदार अगर सारा भरणारे असतील, अशांचीच नांवें मतदार म्हणून नोंदली जातील. जमिनीचा कबजेदार एक व सारा भरणारा दुसरा असेल, तर त्यापैकीं सारा देणारास मताधिकार मिळेल.

**खोत** (२) खोत अगर खोतीगांवांतील हिस्सेदार रुपये ८ पेक्षां कमी नाहीं, इतका सारा भरणारे अशांची नांवें मतदारांचे यादींत नोंदली जातील.

**जमीन कसणारी कुळें** [३] [अ] जमिनीच्या मालकांप्रमाणें व खोताप्रमाणें मालकांची व खोतांची खंडकरी कुळेंहि मतदार होतील. त्या त्या विशिष्ट भागांत ठरल्याप्रमाणें ८, ६, ४ किंवा ३ रुपये साऱ्याची जमीन कसणाऱ्या कुळांनां मताधिकार राहील.

**एकत्र मिळून जमीन कसणारीं कुळें** [ब] एखादी जमीन अनेक कुळें एकत्र कसत असतील, त्या ठिकाणी:

[१] जमिनीचें स्वतंत्र विभाग पाडून जें तें कूळ आपापल्या विभागाची स्वतंत्र वहिवाट करीत असेल, अगर

[२] जमिनीचें असे विभाग पाडलेले नसून एकवट जमीन कसत असतील, तर त्या सर्वांचें हिस्से समसमान आहेत असें समजून,

ज्या कुळांकडे जो विभाग अगर हिस्सा असेल, त्यावरील साऱ्याचें प्रमाण त्या त्या मतदार-संघांत ठेवलल्या लायकींच्या प्रमाणांत बसत असेल, तर त्यास अधिकार मिळेल

**सर्व्हे न केलेल्या अगर बिन-आकारी जमिनीबद्दल** [४] सर्व्हे न केलेल्या गांवच्या अगर इतर बिनआकारी जमिनीचा मगदूर पाहून व अंदाजी आकार ठरवून, ज्या तालुक्यांत तो गांव असेल, त्या तालुक्यांतील मतदारांचे लायकीसाठीं साऱ्याचें जे प्रमाण ठरविलेलें असेल, त्या प्रमाणांत वर सांगितलेल्याप्रमाणें अंदाज करून ठरविलेल्या साऱ्याची जमीन धारण करणारास व ती जमीन कसणाऱ्या कुळांस मताधिकार राहील.

[५] जो कोणी इसम शिरवळ व पाली या दोन गांवांत

**घरमालक व भाडेकरी** [अ] घरमालक ह्मणून दरसाल १ एक रुपया घरपट्टी देणारा अगर

[ब] भाडेकरी या नात्यानें दरसाल रुपये २४ चोवीस घरभाडें देणारा असेल, यास मतदानाचा हक्क राहील.

**मोहतर्फी** [६] दरसाल निदान १ एक रुपया मोहतर्फा भरणारा व्यापारी,

**धनगरमहाल** [७] दरसाल कमीतकमी १।८।१२ एक रुपया बारा आणे धनगरमहाल वर भरणारा धनगर.

टीप :— धनगरांपैकीं सर्व मरगळे व गावडे धनगर यांस मतदानाचा अधिकार राहील;

सरकारी नोकर व पेन्शनर [८] दरमहा पंधरा १५ रुपये [ पगार ] पावणारा सरकारीं नोकर;

[९] दरमहा ७ सात रुपये पावणारा सरकारी पेन्शनर;

शिक्षण [१०] ज्याची मराठी अगर इतर कोणत्याही देशी भाषेची चौथी इयत्ता पास झाली आहे अगर शैक्षणिक लायकी तितक्या योग्यतेची आहे, असा इसम;

टीप:— (१) ही शैक्षणिक लायकी सिद्ध करण्याची जबाबदारी ज्या त्या इसमावर राहील.

(२) स्त्रियांना व मागासलेल्या जातींना शैक्षणिक लायकी केवळ 'साक्षरता' ह्मणजे लिहितांवाचता येणें, येवढीच राहील.

मागसलेल्या जातीसाठीं लायकी (३) मागसलेल्या जातीसाठीं मतदार होण्याकरितां मालमत्तेच्या लायकीचे प्रमाण इतरांच्या निम्में राहील.

गांव-कामगार महार व रामोशी [११] जो जो महार अगर रामोशी गांवकामगार या नात्यान याचा प्रसिद्ध होण्याच्या वेळीं काम करीत ( Officiating ) असेल, अशा इसमास मताधिकार राहील.

मात्र केवळ बदली ह्मणून काम करणारास हा मताधिकार राहणार नाहीं.

एकत्र कुटुंबांतील इसमास मताधिकार [१२] ज्या ठिकाणीं हिंदू एकत्र कुटुंब असेल, त्या ठिकाणीं एकत्र कुटुंबाची मिळकत धारण करणारा मालक अगर एकत्र कुटुंबाचा म्यानेजर, इतर शर्ती अन्वयें मताधिकारास तो लायक असल्यास, त्यासच फक्त मतदानाचा हक्क राहील.

टीप :— हिंदुशिवाय ज्या इतर जातींत हिंदू लॉ प्रमाणें एकत्र कुटुंब असेल व ज्यांना हिंदू लॉ लागूं असेल, अशा अहिंदूलोकांना वरील नियम लागूं पडेल.

[ ड ] विशिष्ट मतदारसंघाची लायकी :—

विशिष्ट मतदार संघाच्या मतदाराची लायकी

(१) जो कोणी इनामदार इनामदारसंघाच्या मतदारांच्या प्राथमिक याद्या प्रसिद्ध होण्यापूर्वीच्या जून महिन्याच्या पहिल्या तारखेस असा असेल, कीं ज्यास सर्व संस्थानांत मिळून दरसाल रु. २५ पंचवीस अगर जास्त कॅश अलावन्स् अगर इनामगांवचे अगर हक्कदारीचे पंचवीस २५ रुपये मिळतात, अशा इसमास या मतदारसंघाचा मतदार ह्मणून नोंदविलें जाईल; अगर

(२) जे लोक आठ ८ रुपयापेक्षां कमी नाहीं, अशी धाऱ्याची इनामी जमीन धारण करीत असतील, त्यांचा या संघांत समावेश केला जाईल.

इनामजुडी भरणारे इनामदार

(३) संस्थानांत इनामदाराकडून घेतल्या जाणाऱ्या इनामजुडीचें प्रमाण सर्वत्र सारखें नाहीं. यास्तव, इनामदार जी जमीन धारण करतो, त्या जमिनीच्या मगदुरानुसार खालसा जमिनीप्रमाणें तिच्यावर भर आकार बसविला असतां, जो आकार होईल तो आकार रुपये ८ आठ पेक्षां कमी नसल्यास, अशी जमीन धारण करणाऱ्या इनामदारास इनामदारांच्या विशिष्टमतदारसंघाचा मतदार ह्मणून नोंदण्यांत येईल.

टीपः—वरील नियम (३) सर्व्हे न झालेल्या गांवाला लागूं आहे; व नियम क (१२) हा इनामदारसंघासहि लागूं आहे.

(इ) संयुक्त मतदारसंघ—

संयुक्त मतदारसंघ

हरिजनांकरितां सर्व संस्थानचा संयुक्त मतदारसंघ करण्यांत आला आहे. नागर, विशिष्ट व पांच ग्रामीण मतदारसंघ, या सर्व मतदारसंघांतील मतदारांना संयुक्त मतदारसंघातर्फे निवडून येणाऱ्या हरिजन उमेदवारास मत देण्याचा अधिकार आहे.

———

## भाग चवथा

# मतदारांच्या याद्या

९ (अ) प्रत्येक मतदारसंघाकरितां एक मतदारांची यादी केली पाहिजे. ही यादी सरकारमार्फत करण्यांत यावी.

मतदारांच्या याद्या

(ब) शिक्षण, भनगरमहाळकर, जमीन कसणें ( कुळें ): या लायकीनुसार मतदार होण्यास जे लायक असतील, त्यांनीं तालुक्यांचे मामलेदार यांजकडे प्राथमिक यादी प्रसिद्ध झाल्यापासून ३० तीस दिवसांचे आंत अर्ज करून आपलीं नांवें मतदारांच्या यादींत नोंदवून घ्यावींत.

निवडणूक कामगार व त्यांनीं करावयाचीं कामें

१० संस्थानच्या पांचही तालुक्यांचे मामलेदार आपआपल्या अधिकारक्षेत्रातील ग्रामीण मतदासंघाचे निवडणूककामगार [ Returning Officer ] असतील. भोरचा नागरमतदारसंघ, हरिजनांचा संयुक्त मतदारसंघ व इनामदारांचा विशिष्ट मतदारसंघ: यांचे निवडणूककामगार असिस्टंट कलेक्टर हे असतील. सर्व ग्रामीण संघातील मतदारांच्या याद्या मामलेदार यांनीं, भोर नागरमतदारसंघाची यादी म्युनिसिपल प्रेसिडेंट यांनीं आणि विशिष्टमतदारसंघाची यादी असिस्टंट कलेक्टर यांनीं तयार केली पाहिजे. या यादीत मतदारांचीं नांवें त्यांच्या नांवाच्या वर्णानुक्रमानें घातली पाहिजेत; आणि अशी यादी निवडणूककामगारांनीं आपाआपल्या कचेरींत आणि मतदारसंघांतील सर्व मतदानस्थानीं [ पोलिंग स्टेशन Polling Station ] व प्रत्येक गांवीं ( त्या गांवापुरती ) चिकटवून प्रसिद्ध केली पाहिजे. मतदारांच्या यादीची ही प्राथमिक प्रसिद्धी होय. यादी प्रसिद्ध झाली हे कळण्याकरितां गांवोगांव दवंडी देण्याची योजना, जरूर तर, कलेक्टर यांस करतां येईल.

विशिष्ट मतदार संघाची यादी

११ (अ) इनामदारांच्या विशिष्टमतदारसंघाकरितां प्रत्येक तालुक्यांतील लायक असलेल्या सर्व इनामदारांची यादी तालुक्याचे मामलेदार यांनीं तयार करून ती असिस्टंट कलेक्टर यांचेकडे पाठविली पाहिजे; व मतदार ह्मणून नोंदले जाण्याचा ज्यांना हक्क आहे असे दिसून

येईल, अशा सर्व संस्थानांतील इनामदारसंघातील मतदारांची सरयादी आसिस्टंट कलेक्टर यांचेकडून तयार करण्यांत येऊन, ती प्रत्येक तालुक्याचे मुख्य ठिकाणीं प्राथमिक प्रसिद्धीकरितां पाठविली जाईल.

(ब) यादीच्या प्राथमिक प्रसिद्धीपासून ३० तीस दिवसांचे आंत सर्व संस्थानांत मिळून ज्यांना रुपये २५ पंचवीस अगर जास्त क्याश अलावन्स पावतो, अगर रुपये ८ आठ पेक्षां कमी नाहीं इतकी इनाम जमीन आहे, अशा इनामदारांनीं आपली लायकी आसिस्टंट कलेक्टर यांचे निदर्शनास अर्जद्वारे आणून आपले नांव नोंदवून घ्यावयाचे आहे.

१२ इनामदारसंघातील मतदारानें प्राथमिक यादीच्या प्रसिद्धीपासून ४० दिवसाचे आंत असिस्टंट कलेक्टरकडे अर्ज करुन इच्छा दर्शविल्यास, त्यास आपले नांव विशिष्टमतदारसंघातून कमी करून, सामान्य मतदारसंघाच्या लायकीच्या अटीनुसार तो मतदार होऊं शकत असल्यास, सामान्य मतदारसंघाचे यादींत मतदार म्हणून नोंदवितां येईल. असिस्टंट कलेक्टर यांजकडे करावया-च्या अर्जांत, तो ज्या सामान्य मतदारसंघांत नांव नोंदवू इच्छि-तो, त्या संघाच्या लायकीच्या ज्या अटीनुसार मतदार होण्यास तो लायक असेल, ती अट नमूद केली पाहिजे.

इनामदार संघा चे मतदारास सामान्य मत दार संघांत मत देण्यास सवलत.

मात्र, मग त्यास इनामदारसंघात मत देण्याची अगर त्या संघातर्फे उमेदवार म्हणून उभा राहण्याची मोकळीक राहणार नाहीं.

याप्रमाणें आगाऊ बदल करून न घेतल्यास, त्याचें नांव विशिष्ट मतदारसंघातच राहील, व त्याच मतदारसंघात त्यास उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे राहतां येईल.

११ सामान्य मतदारसंघांतील एखाद्या मतदारानें नांव एकापेक्षां अधिक तालुक्यांत मतदार म्हणून नोंदलें गेले असल्यास, त्यापैकीं कोणत्या तरी एका मतदारसंघांत त्यास मत देतां येईल. त्यानें एकापेक्षां अधिक ठिकाणीं मत दिल्यास, त्याची सर्व मतें रद्द होतील.

एकापेक्षां अधिक ठिका-णीं मतें दिल्यास, सर्व मतें रद्द

११ (अ) मतदारांची प्राथमिक यादी व त्या यादीबरोबर प्रसिद्ध होणारी अर्जे करण्याबद्दलची नोटीस नियमांप्रमाणें सर्व ठिकाणीं अगर ठरलेल्या मुदतींत प्रसिद्ध झाली नाहीं, या सबबीवर ती मतदाराची यादी रद्द केली जाणार नाहीं; आणि त्याच कारणास्तव एखाद्या इसमास आपलें नांव मतदाराच्या यादींत नोंदलें जाण्याचा हक्क असल्याबद्दल तक्रारही करतां येणार नाहीं.

१४ (अ) शैक्षणिक लायकीवर नांव नोंदवूं इच्छिणारी व्यक्ति स्त्री असल्यास, त्या स्त्रीनें अगर तिच्या वतीनें कोणीहि तिचें नांव नोंदवून घेण्यासाठीं निवडणूककामगार यांचेकडे अर्ज करण्यास परवानगी आहे.

शैक्षणिक लायकीनें मतदार होणारानें नांव कस नोंदवून घ्यावें?

[अ] मतदार ह्मणून नांव नोंदवू इच्छिणारास, साक्षरता सिद्ध करण्यासाठीं ज्या गांवांस तो रहात असेल तेथील गांवकामगाराचे [ पाटील व कुळकर्णी अगर तलाठी याचे ] शिफारसपत्र, तो गांव ज्या तालुक्यांत असेल त्या तालुक्याच्या मामलेदाराच्या ( Counter Signature ) तें बरोबर असल्याबद्दलच्या सहीसह, अगर त्या तालुक्याच्या अव्वल कारकुनाचें अगर शाळेच्या हेडमास्तरचे अगर हेडमिस्ट्रेसचे अगर शाळाधिकाऱ्याचे अगर संस्थानसरकारकडून मान्यता पावलेल्या शिक्षणसंस्थेच्या चालकाचे ठराविक नमुन्याचें शिफारसपत्र [ परिशिष्ट ४ यांतील नमुन्याप्रमाणें ], मामलेदार यांजकडे करण्याच्या अर्जासोबत पाठवून आपले नांव नोंदवून घेतां येईल; अगर मामलदार यांजकडे स्वतः हजर राहून त्यास वाचून अगर लिहून दाखवून आपण साक्षर असल्याचे त्याच्या निदर्शनास आणून त्याला आपलें नांव नोंदवून घेतां येईल.

[ब] मतदार ह्मणून नांव नोंदवूं इच्छिणारास, मराठी ४ थी इयत्ता पास अगर तितक्या योग्यतेचे शिक्षण झाल्याबद्दल शाळेच्या हेडमास्तर अगर हेडमिस्ट्रे-सचे अगर शाळाधिकाऱ्याचे अगर संस्थानसरकारकडून मान्यता पावलेल्या शिक्षणसंस्थेच्या मालकाचे अगर तालुक्याचे मामलेदार अगर

अव्वल कारकून यांचें ठराविक नमुन्याचे शिफारसपत्र [ परिशिष्ट ४ यांतील नमुन्याप्रमाणे ], मामलेदार यांजकडे करावयाच्या अर्जासोबत पाठवून आपले नांव नोंदवून घेतां येईल.

१५ मतदारांच्या यादींत खालील माहिती असली पाहिजे:

मतदारांच्या यादींतील तपशील.

[अ] मतदारसंघाचें नांव,

[आ] खेडें अगर गांव अगर शहराचें नांव,

[इ] मतदारांची नांवांच्या वर्णानुक्रमानें नांवें,

[ई] मतदाराचे सामान्यत: राहण्याचें ठिकाण,

[उ] मतदाराच्या बापाचें नांव, व विवाहित स्त्रीच्या बाबतींत तिच्या नवऱ्याचें नांव, आडनांवासहित; स्त्रित इसमाच्या बाबतींत बापाच्या नांवाची जरूरी आहे असें नाहीं,

[ऊ] मतदाराची पात्रता,

[ऋ] ज्या दिवशीं अगर ज्या दिवसापूर्वी हक्क अगर हरकत मांडावयाची तो दिवस.

हक्क अगर हरकती यासंबंधीं तजविजी.

१६ (१) अशी प्राथमिक यादी व तिचे भाग प्रसिद्ध करण्याच्या वेळीं एक जाहीरनामा कलेक्टरचे प्रसिद्ध केला पाहिजे व या जाहीरनाम्यानें ज्यांना हक्क सांगणें अगर हरकती घेणे असेल, त्यांनीं तसें करण्याबद्दल फर्मावेिले पाहिजे; सर्वांना मिळण्यासाठीं मतदाराची यादी विक्रीकरितां ठेवली पाहिजे.

हक्क अगर हरकती यासंबंधीं तजवीजी

(२) मतदारांची प्राथमिक यादी प्रसिद्ध झाल्यातारखेपासून, प्रसिद्धीचा दिवस सोडून, तीस ३० दिवसाचें आंत निवडणूककामगार यांजकडे हक्काची प्रत एक अगर हरकतीच्या प्रती ४ चार, कारणांसह, सादर केल्या पाहिजेत.

मोर नागरमतदारसंघांतील मतदारांनीं आपलें हक्क अगर हरकतीबद्दलचे अर्ज असिस्टंट कलेक्टर यांजकडे केले पाहिजेत.

त्या तारखेनंतर ४ चार दिवसांचे आंत, लँड रेव्हिन्युकोडमध्यें सांगितलेल्या पद्धतीस अनुसरून, या हक्क अगर हरकतीचा संक्षिप्त ( Summary ) पद्धतीनें निवडणूककामगार निकाल करतील व तो हक्क अगर हरकतदार यांस कळवितील; आणि या निकालास अनुसरून मतदारांच्या यादींत दुरुस्ति करण्यांत येईल.

या सर्व दुरुस्त्या योग्यप्रकारें प्रसिद्ध करण्यांत येतील.

(३) हक्क अगर हरकती समक्ष अगर पोस्टानें मांडतां येतील; व त्या सादर करतांना कोर्टफीचें तिकीट लावण्याची जरूरी नाहीं.

(४) हक्क अगर हरकती लेखी असल्या पाहिजेत; व

हक्क अगर हरकतीतील तपशील.

त्यांत वादाचा विषय असलेला मतदारसंघ, ज्यामुळें एकाद्या इसमाचा मतदार ह्मणून नाव नोंदण्याचा हक्क सांगितला जातो अगर नाकारला जातो अशी कारणें, हक्कदार अगर हरकतदार आणूं इच्छितात तो पुरावा, हक्कदार अगर हरकतदार यांचा पत्ता, मतदाराचें नांव नोंदलें असल्यास त्याचा यादींतील नंबर व यादीचें संघक्षेत्र इत्यादि गोष्टी स्पष्टपणें नमूद केल्या पाहिजेत.

हरकतीचे बाबतींत ज्याचे नोंदीबद्दल हरकत घेतली जाते, त्या इसमाचा मतदाराचें यादींतील नंबर व त्या यादीचें संघक्षेत्र नमूद केलें पाहिजे.

(५) हरकती मांडण्यासाठीं ठरविलेल्या काळांत मतदारांच्या याद्याचे भाग अगर प्रती सर्वांना पाहण्यासाठीं निवडणूक कामगार यांच्या कचेरींत खुल्या ठेविल्या पाहिजेत.

नामंजूर हक्क अगर हरकत

(६) वर सांगितलेल्या पद्धतीस अनुसरून जो हक्क अगर हरकत मांडण्यांत आली नसेल, तो हक्क अगर ती हरकत विचारांत घेतली जाणार नाहीं.

नामंजूर हक्क अगर हरकती बाबत अपील

(७) हक्क अगर हरकतीसंबंधीं निवडणूककामगार यांनी केलेल्या निकालाविरुद्ध ज्यांना दाद मागावयाची असेल, त्यांना संस्थानच्या त्या त्या तालुक्याकरितां असलेल्या सबजज्जाकडे अर्ज करून आपल्या हक्क अगर हरकतीबाबतचा निर्णय लावून घेतां येईल.

असा अपीलअर्ज, निवडणूककामगार यानें निकाल करण्या-साठीं ठरविलेल्या तारखेपासून; ४ चार दिवसांच्या आंत केला पाहिजे.

(अ) हक्क अगर हरकतीबद्दलचा अपीलअर्ज सबूजज्जाकडे गुदरल्यावर त्या सबूजज्जाने त्या हक्क अगर हरकतीची पूर्व-चौकशी करणाऱ्या निवडणूककामगारास प्रतिवादी म्हणून दाखल करून अपीलअर्जाची नक्कल त्यास द्यावी; अशा अर्जात जेव्हां दुसऱ्या इसमाचें नांव मतदाराच्या यादींत दाखल करण्यास हरकत घेतली असेल, तेव्हां त्या हरकतीची नक्कल त्या इसमास पुरविली पाहिजे; व अर्जाच्या चौक-शीची तारीख वेळ व जागा नेमून ती नोटीशीनें अर्जदार, प्रतिवादी व असा इसम यांना, जरूर तेथें, मतदारांच्या यादींतील त्याचे पत्त्यावर कळविली पाहिजे; आणि हक्क अगर हरकतीची एक नक्कल आणि चौकशीच्या तारखेची नोटीस सबूजज्जानें आपल्या कचेरींतील बोर्डावर लाविली पाहिजे

(आ) अशा अपीलअर्जांतील चौकशीच्या कामीं पक्षकारांनीं हजर केलेला व आणखीं कोर्टास जरूर वाटेल तो पुरावा घेऊन सबजज्जानें अर्जाचा निकाल करावा. आणि जर अर्जांतील विषय वादग्रस्त असल्यामुळें त्याचा निकाल संक्षिप्त [ Summary ] पद्धतीनें करणें अशक्य असून त्या-बाबद दिवाणी कोर्टांत चौकशी व्हावी असें जज्जास वाटेल, तर तो हक्क अगर हरकतीचा अर्ज त्यानें काढून टाकला पाहिजे.

(इ) या निकालाची एक नक्कल सबजज्जानें निवडणूककामगाराकडे पाठविली पाहिजे.

(ई) हक्क अगर हरकतीसंबंधीं अपीलअर्ज पुष्कळ प्रमाणांत दाखल होऊन अर्जाच्या चौकशीकरितां ठरविलेल्या

मुदतींत [ २ दोन आठवड्यांत ] त्यांचा निकाल करणें अशक्य असल्याचें सबजज्जास दिसून आल्यास, त्यानें रिपोर्टानें कलेक्टर यांस तसें कळविलें पाहिजे व कलेक्टरने ती गोष्ट श्रीमंत राजेसाहेब यांस जाहीर करावी.

त्या रिपोर्टास अनुसरून त्या अर्जांचा निकाल मुदतींत होण्यास, त्या सबजज्जाचे मदतीस आणखी जरूर तेवढे इसम श्रीमंत राजेसाहेब यांस नेमतां येतील, व चौकशीचें काम विभागून त्याजकडे सोपवितां येईल.

१७ मतदारांच्या सर्व याद्या मराठींत प्रसिद्ध होतील. सर्व दुरुस्त्या बरोबर झाल्यानंतर याद्यांची पुनः प्रसिद्धी होईल, व ही शेवटची [ Final ] यादी समजण्यांत येईल.

शेवटच्या यादी-ची मुदत.

या यादींत पांचवर्षेपर्यंत अथवा सामान्य [ General ] फेरनिवडणूक होईपर्यंत फेरबदल करण्यांत येणार नाहीं.

ही शेवटची यादी एखादा इसम मतदार आहे किंवा नाहीं हें ठरविण्याच्या कामीं निर्णायक समजली जाईल.

---

## भाग पांचवा

---

# निवडणूक

[अ] उमेदवाराच्या निवडणुकीबाबतची नेमणूक.

१८ [अ] या नियमान्वये कोणत्याही मतदारसंघातर्फे निवडून येण्यास पात्र असणाऱ्या कोणाही इसमास त्या त्या मतदारसंघांतील निवडणुकीस उमेदवार म्हणून नेमतां येईल.

[आ] कलेक्टर हे प्रत्येक मतदारसंघाकरितां खालीलप्रमाणें तारखा नेमतील:

नेमणूकीची तारीख

[१] मतदारसंघातर्फे प्रतिनिधि निवडण्यांत यावा असें फर्मावणाऱ्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १४ दिवसाहून कमी नाहीं, अशी उमेदवारांच्या नेमणुकीची तारीख,

[२] वर नमूद केलेल्या तारखेपासून चार दिवसाहून उशीरा नाहीं, अशी एक नेमणुकीच्या छाननीची (Scrutiny) तारीख, व

[३] मतदानाकरितां एक पुढील तारीख अगर तारखा.

कलेक्टर हे अशा ठरविलेल्या तारखा ग्याझेटमध्यें व गांवोगांव जाहीरनामे प्रसिद्ध करून मतदारसंघांत प्रसिद्ध करतील.

नेमणुकीचा कागद केव्हां, कसा आणि कोणाकडे सादर करावयाचा

[इ] उमेदवारांच्या नेमणुकीसाठीं नेमलेल्या तारखेस अगर त्या तारखेपूर्वी, पण जाहीरनाम्याच्या प्रसिद्धीच्या तारखेनंतर, प्रत्येक उमेदवारानें स्वत: अगर त्याचें नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा या उभयतांनीं मिळून दुपारी १२ वाजल्यापासून ४ वाजेपर्यंतच्या काळांत, सुट्टीचा दिवस सोडून, निवडणूक कामगार यांजकडे नेमणुकीचा कागद दिला पाहिजे.

नेमणुकीसाठीं नेमलेली तारीख सुट्टीचा दिवस असेल, तर त्याचे दुसरे दिवशीं नेमणुकीचा कागद दिला, तर तो योग्य मुदतींत दिला असें समजलें जाईल. नेमणुकीचा कागद परिशिष्ट ५ यांत नमूद केल्याप्रमाणें भरून पुरा केलेला असला पाहिजे; व त्यावर सदर नेमणुकीस आपली संमति आहे, अशा अर्थाची त्या उमेदवाराची सही असली पाहिजे; उमेदवाराचें नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा हे दोघेहि त्या मतदारसंघांतील मतदार असले पाहिजेत व त्यांनीं वरील कागदावर आपल्या सह्या केल्या पाहिजेत.

मात्र, उमेदवाराच्या नेमणुकीकरितां कलेक्टरनें नेमलेल्या तारखेस दुपारीं ४ वाजल्यानंतर नेमणुकीचा कागद आल्यास, तो नाकारला जाईल.

नेमणुकीचा कागद सादर केल्यावर त्या-संबंधीं निवड-

(ई) पोटनियम [ इ ] अन्वयें नेमणुकीचा कागद पोचल्यावर निवडणुक कामगार अगर त्यानें अधिकृत केलेला इसम यानें तो कागद सादर करणाऱ्या इसमास नेमणुकीच्या छाननीकरितां नेमलेली तारीख, वेळ व जागा कळविली पाहिजे; व

त्या नेमणुकीच्या कागदावर अनुक्रम नंबर घातला पाहिजे, आणि तो नेमणुकीचा कागद ज्यावेळीं त्याजकडे सादर झाला ती वेळ व तारीख

ूकामगा- ज्यांत आहे असें सर्टीफिकेट त्या कागदावर लिहून, त्याखालीं आपली
रानें करावया- सही केली पाहिजे; आणि
च्या तजविजी. त्यानंतर शक्य तितक्या लवकर आपल्या कचेरींत एखाद्या ठळक जागीं तो उमेदवार व त्याचें नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा ह्मणून नेमणुकीच्या कागदावर सही करणारा इसम यांचें निवडणुकीच्या कागदांत असल्याप्रमाणें वर्णन दिलेली अशी नेमणुकीची नोटीस लाविली पाहिजे.

(उ) निवडणुककामगारानें त्याजकडे आलेल्या नेमणुकीच्या कागदाची छाननी नेमलेल्या तारखेस केली पाहिजे, आणि नेमणुकीस घेण्यांत आलेल्या हरकतींचा निकाल त्यानें स्वतःच्या मनानें ठरविला पाहिजे. नेमणुकीच्या कागदांची छाननी करतांना खालीं दिलेल्या कारणां- करितां त्यास नेमणुकीचा कागद नाकारतां येईल:

नेमणुकीच्या कागदांची छाननी

(१) तो उमेदवार निवडणुकीस उभा राहण्यास लायक नसला, अगर

(२) त्याचें नांव सुचविणारा अगर अनुमोदन देणारा या नियमानुसार लायक नसल्यास, अगर

(३) पोट–नियम (इ) अन्वयें नेमणुकीचा कागद दिला गेला नसल्यास, अगर

(४) त्या उमेदवाराचें, नांव सुचविणाराचें अगर अनुमोदन देणाराचें, नेमणुकीच्या कागदांत दाखल केलेलें, नांव मतदाराच्या यादींतील त्याचें नांव अगर नंबर यांच्याशीं विसंगत असल्याचें दिसून आल्यास, अगर

(५) त्या उमेदवाराची, नांव सुचविणाराची अगर अनुमोदन देणाराची सही बरोबर नाहीं अगर त्याजकडून फसवून घेण्यांत आली आहे असें दिसून आल्यास

(ऊ) नेमणुकीच्या कागदाच्या छाननीकरितां कलेक्टरनें नेमलेल्या तारखेच्या दुसऱ्या दिवशीं दुपारीं ४ वाजण्यापूर्वी निवडणूककामगार अगर त्यानें अधिकृत केलेला दुसरा इसम याजकडे दिलेल्या व आपण सही केलेल्या अशा लेखी नोटीशीनें कोणाहि उमेदवारास आपली उमेदवारी परत घेतां येईल.

उमेदवारी परत घेणे

मात्र, त्या उमेदवारास आपली परत घेतलेली [ Withdrawn ]

उमेदवारी नंतर रद्द करतां येणार नाहीं; अगर त्याच नेमणुकींत उमेदवार ह्मणून त्याची पुन्हां नेमणूक करतां येणार नाहीं.

[ऋ] पोट–नियम [ऊ] अन्वयें उमेदवारी परत घेण्याची नोटीस पोंचल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, निवडणूककामगार अगर त्यानें अधिकृत केलेला इसम यानें उमेदवारी परत घेतल्याची नोटीस आपले कचेरींत कोणत्याहि प्रमुख जागीं लावली पाहिजे.

**लायक ठरलेले उमेदवार**

(ॠ) नेमणुकीच्या कागदाची छाननी झाल्यावर व उमेदवारी परत घेण्याची मुदत संपल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, लायक ठरलेल्या उमेदवारांची यादी निवडणूककामगारानें आपल्या कचेरींत प्रमुख ठिकाणीं लावून प्रसिद्ध केली पाहिजे

**नेमणुकीच्या वेळीं अमानत ठेवावयाची रक्कम**

१९ (क) उमेदवारांच्या नेमणुकीकरितां नेमलेल्या तारखेस अगर त्यापूर्वी प्रत्येक उमेदवारानें ५० रुपयांची रोख रक्कम निवडणूक कामगार यांजकडे अमानत ठेविली पाहिजे; व अशी रक्कम अमानत जर ठेविली नसेल तर त्या उमेदवाराची नेमणूक योग्यरीतीनें झाली असें समजण्यांत येणार नाहीं.

**अमानतीची रक्कम परत करणें**

(ख) पोट–नियम [क] यांत उल्लेख केलेली अमानत रक्कम ज्या उमेदवारानें अगर ज्याचेतर्फे हजर केली असेल, त्यानें जर नियम १८ पोट नियम [ऊ] यांत नमूद केलेल्या पद्धतीनें व मुदतींत आपली उमेदवारी परत घेतली असेल, अगर अशा उमेदवाराची जर नेमणूक नाकबुल करण्यांत आली असेल, तर अमानतीची रक्कम त्या उमेदवारास परत केली जाईल; आणि

जर एखादा उमेदवार मतें नोंदणीस [Polling] सुरुवात होण्यापूर्वी मयत झाला असेल, तर अशी अमानत रक्कम त्या उमेदवारानें हजर केली असल्यास, त्याचे कायदेशीर वारसास परत केली जाईल.

**अमानत सरकार जमा करणें**

[ग] ज्या उमेदवारानें अगर ज्याचेतर्फे पोट–नियम [क] यांत उल्लेख केलेली रक्कम हजर केली असेल, तो जर निवडून आला नाहीं व त्यास मिळालेल्या मतांची संख्या, नोंदलेल्या [ Polled ] मतांचे संख्येच्या एक-अष्टमांशापेक्षां, कमी असेल तर सदरहू अमानतीची रक्कम

सरकारजमा केली जाईल.

**टीपः—** गैरकायदा म्हणून वाया गेलेल्या मतपत्रिका वगळून मोजण्यांत आलेल्या मतपत्रिकांची एकंदर संख्या, ही नोंदलेल्या मतांची संख्या होय.

[घ] पोट नियम [क] यांत उल्लेख केलेली अमानत रक्कम ज्यानें अगर ज्याचेतर्फे हजर केली असेल, असा उमेदवार निवडून आला आणि पुढें ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें शपथ अगर प्रतिज्ञा करण्यांस तो चुकल्यामुळें त्याची जागा रिकामी झाल्याचें ठरविण्यांत आलें, तर अमानतीची रक्कम सरकारजमा केली जाईल.

**अमानत रक्कम परत करणें**

(ङ) (१) निवडून न आलेल्या उमेदवाराच्या बाबतींत, हजर केलेली अमानतीची रक्कम पोट-नियम (ब) प्रमाणें सरकारजमा झाली नसेल, तर ती त्या उमेदवारास, गॅझेटांत निवडणुकीचा निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर परत केली पाहिजे; आणि

(२) निवडून आलेल्या उमेदवाराचे बाबतींत, हजर केलेली अमानतीची रक्कम पोट-नियम (घ) अन्वयें सरकारजमा करण्यांत आली नसेल तर पुढें ठरविण्यांत आलेल्या नमुन्याप्रमाणें त्या उमेदवारानें शपथ अगर प्रतिज्ञा केल्यावर, शक्य तितक्या लवकर त्यास ती परत केली पाहिजे.

**२० नेमणुकीच्या पूर्वी नेमलेल्या उमेदवाराचा मृत्यू**

छाननीकरितां नेमलेल्या तारखेनंतर व मतनोंदणीकरितां (Polling) नेमलेल्या तारखेपूर्वी जर योग्यरीतीनें नेमणूक झालेला उमेदवार मयत झाला, तर निवडणूककामगार अगर दुसरा अधिकृत इसम यांची उमेदवार मयत झाला आहे अशी खात्री झाल्यास, त्यांनें मतांची नोंद करणे रहित केले पाहिजे व कलेक्टर यांचेकडे रिपोर्ट केला पाहिजे आणि निवडणुकीसंबंधीं, नव्या निवडणुकीप्रमाणें, पुनः पूर्ववत सुरुवात केली पाहिजे. मात्र, इतकेंच कीं, ज्याची नेमणूक झाली आहे, त्या उमेदवाराच्या बाबतींत पुनः नवी नेमणूक करण्याची जरूरी नाहीं.

[ ब ] निवडणुकीची पद्धति

२१ जागांपेक्षां अधिक उमेदवार ज्यांची योग्य रीतीने नेमणूक झालेली आहे व ज्यांनीं नियम १८ पोटनियम (ऊ) यांत नमूद केलेल्या पद्धतीस अनुसरून व नमूद केलेल्या काळांत आपली उमेदवारी परत घेतली नाहीं,

(अ) अशा उमेदवारांची संख्या जर ठरलेल्या जागांच्या संख्येपेक्षां अधिक असेल, तर मतांची नोंद [ Polling ] केली पाहिजे;

रिकाम्या जागा इतकेच उमेदवार [आ] अशा उमेदवारांची संख्या जर ठरलेल्या जागांचे संख्ये एवढीच असेल, तर सर्व उमेदवार योग्य रीतीनें निवडून आले असें जाहीर करण्यांत येईल; व

रिकाम्या जागा पेक्षां कमी उमेदवार (इ) अशा उमेदवारांची संख्या जर ठरलेल्या जागांपेक्षां कमी असेल, तर ते सर्व उमेदवार योग्य रीतीनें निवडून आल्याचें जाहीर करण्यांत येईल; आणि

उरलेल्या रिकाम्या जागा भरण्यासाठीं गॅझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून त्या मतदारसंघाला, गॅझेटांत प्रसिद्ध केलेल्या वेळेच्या आंत, जरूर तेवढे इसम निवडून देण्यासाठीं कलेक्टर फर्मावितील

मात्र, अशी संधि या पोट—नियमान्वयें देऊनहि, जर मतदार-संघ जरूर तितके उमेदवार निवडून देणार नाहीं अगर त्या मतदार संघातर्फे कोणीहि उमेदवार उभा राहणार नाहीं, तर त्या मतदारसंघास उमेदवार निवडून देण्याची संधि त्या कौन्सिलच्या मुदतींत कलेक्टर यांना पुन: देतां येणार नाहीं.

( क ) मत देण्याचा हक्क व मतांची मोजणी

२१ (अ) ग्रामीण मतदारास दोन मतें देण्याचा अधिकार — ग्रामीण मतदारसंघाच्या यादींत ज्याचें नांव नोंदलें असेल, अशा प्रत्येक इसमास त्या मतदारसंघातर्फे उमेदवारांच्या निवडणुकीच्या वेळीं दोन मतें देण्याचा अधिकार आहे.

(आ) संयुक्त संघांत एक मत — संयुक्त मतदारसंघाच्या हरिजन उमेदवारालही एक वेगळें, तिसरें मत देण्याचा अधिकार ग्रामीण, नागर व विशिष्ट या मतदारसंघांतील प्रत्येक उमेदवारास आहे.

टीपः—— संयुक्तसंघातर्फेच्या हरिजनउमेदवाराकरितां देण्याचें मतदारास असलेलें एक मत ग्रामीण संघांत देतां येणार नाहीं, अगर ग्रामीण संघाकरितां असलेलीं दोन मतें संयुक्तमतदारसंघांत देतां येणार नाहींत.

२३ कोणत्याही ग्रामीण मतदारसंघातर्फे दोन उमेदवार निवडले जातील त्या मतदारसंघांतील प्रत्येक मतदारास, तशी त्याची इच्छा असल्यास, आपल्या मतांपैकीं, अनेक उमेदवारांपैकीं, कोणत्याही दोघांना प्रत्येक उमेदवारास एक एक मत यार्प्रमाणें देतां येईल किंवा कोणत्याही एका उमेदवारास आपलीं दोनहीं मतें देतां येतील.

**एकाच उमेदवारास दोनही मतें**

२४ मतें गुप्तमतदानपद्धतीनें (Ballot) नें व त्या त्या मतदारसंघासाठीं ठेवलेल्या मतदानस्थानीं ( Polling Stations ) मतदारानें स्वतः जाऊन व सोबत जोडलेल्या परिशिष्ट ५ मधील नंबर १ च्या नमुन्या-प्रमाणें असलेल्या मतपत्रिकेंत लिहून दिलीं पाहिजेत.

**मतदानाची गुप्तमत-दानपद्धती**

मात्र, निवडणुकीच्या कामगिरीवर असलेल्या संस्थानचे कोणाहि नोकराचे बाबतींत संस्थानचे कलेक्टर हे, जरूर तर, ज्या ठिकाणीं त्यास नेमले आहे, त्या निवडणुकीच्या जागीं त्यास आपलें मत नोंदतां येईल अशी तजवीज करतील.

२५ (अ) मतें मोजण्याच्या तारखेची योग्य सूचना देऊन निवडणुककामगार यांजकडून अगर त्याच्या देखरेखीखालीं मतें मोजण्यांत येतील, त्यावेळीं प्रत्येक उमेदवारास अगर त्यानें लेखी अधिकार दिलेल्या कोणाहि एका इसमास हजर राहण्याचा अधिकार राहील.

**मतांची मोजणी व त्यावेळीं हजर राहणार इसम**

(आ) वरील भाग (अ) यांत सांगितल्याप्रमाणें मतांचीं मोजणी झाल्यावर, ज्यास सर्वांत अधिक मतें मिळालीं असतील, असे एक अगर अधिक उमेदवार निवडून आल्याचे निवडणूककामगार यांनीं लागलेंच जाहीर केलें पाहिजे

(इ) उमेदवारास मिळालेलीं मतें सारखीं असल्याचें आढळून आल्यास, त्यापैकीं कोण निवडून आला त्याचा निकाल निवडणूक-

**समान मतें पडल्यास चिट्ठ्या टाकून निर्णय** — कामगार यानें स्वतःचे समक्ष चिठ्ठ्या टाकून [ Drawing Lots ] करावा.

(ई) [१] निवडणूककामगार यांनीं विलंब न लावता निवडणुकीचा निकाल प्रातिनिधिक कायदेमंडळाचे सेक्रेटरी यांजकडे कळविला पाहिजे.

[२] अशा निवडून आलेल्या उमेदवारांचीं नांवें गॅझेटांत प्रसिद्ध केलीं जातील.

(उ) निवडणुकीबाबतच्या खर्चाचा हिशेब

२६ निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्याचें आंत प्रत्येक उमेदवारानें निवडणुकीच्या कामीं आपला किती खर्च झाला याच्या हिशेबाचे पत्रक, त्यावर स्वतःची सही व प्रतिज्ञालेख करून, निवडणूक कामगार यांजकडे पाठविले पाहिजे;

तसें त्याजकडून मुदतींत न झाल्यास, त्याबद्दलचा रिपोर्ट वरील तारखेपासून १५ दिवसांचे आंत निवडणूक कामगार यानें कलेक्टर यांजकडे केला पाहिजे.

त्या रिपोर्टास अनुसरून निवडून आलेल्या अशा उमेदवाराची निवडणूक रद्द केली जाईल, आणि त्याचे खालोखाल मतें मिळालेला उमेदवार, त्यानें वरील अटी पाळल्या असतील तर, निवडून आला असें जाहीर करण्यांत येईल.

मात्र, ज्या उमेदवारानें असें खर्चाचें पत्रक पाठविलें नाहीं, तो लाच-लुचपतीच्या कृत्यासंबंधीं नियमास अनुसरून हिशेबाचें पत्रक सादर करण्याच्या तारखेपासून पांच वर्षेपर्यंत निवडणुकीसाठीं उभा राहण्यास अगर मत देण्यास नालायक ठरविला असल्याचें कलेक्टर यांनीं गॅझेटांत प्रसिद्ध केलें पाहिजे.

## भाग ६ वा
## निवडणुकीची व्यवस्था

२७ आपल्या अधिकारांत असलेल्या प्रत्येक मतदारसंघाकरितां अगर त्याचे भागाकरितां, कलेक्टर यांस जरूर वाटतील, तितकीं मतदानस्थानें ठेविलीं पाहिजेत; व तीं मतदानस्थानें ज्या गांवाकरितां ठरविलीं असतील, तीं गांवें दर्शविणाऱ्या याद्या प्रसिद्ध केल्या पाहिजेत.

२८ (अ) प्रत्येक मतदानस्थानाकरितां कलेक्टर हे एक प्रमुख अमलदार [ Presiding Officer ] व अशा अमलदारास मदत करण्याकरितां, त्यास जरूर वाटतील, तितके इसम [ त्यास यापुढें मतस्थानाधिकारी ( Polling Offiicer ) ह्मटले जाईल ] नेमतील.

(आ) एकाच वेळीं होणाऱ्या अनेक मतदारसंघाच्या मतदाना [ Polling ] बाबत प्रत्येक मतदारसंघासाठीं स्वतंत्र प्रमुखस्थानीं असणारा अमलदार नेमण्यांत येईल; व त्याला मदत करण्याकरितां - जरूर तितके मतस्थानाधिकारी प्रत्येक मतदानकेंद्रावर [ Polling Centre ] नेमण्यांत येतील.

(इ) एकाद्या मतदानस्थानाचा अधिकारी कोणत्याही कारणानें गैरहजर असल्यास, प्रमुख अमलदारास त्याच्या बदली दुसरा लायक इसम मतदान-स्थानाधिकारी ह्मणून नेमतां येईल.

मात्र, अशा रीतीनें दुसरा इसम नेमल्याबद्दल त्यानें कलेक्टर यांस लागलेंच कळविलें पाहिजे.

(ई) एकादा प्रमुख अमलदार आजारीपणामुळें अगर अन्य अपरिहार्य कारणामुळें मतदानस्थानीं हजर राहूं न शकल्यास, त्याचें काम करण्या-करितां तेथें काम करणाऱ्या मतदानस्थानाधिकाऱ्यास प्रमुख अमलदार ह्मणून कलेक्टर यांस फर्मावितां येईल अगर त्याच्या जागीं दुसरा इसम प्रमुख अमलदार ह्मणून नेमतां येईल.

२९ (१) प्रमुख अमलदारानें मतदानस्थान व मतदानकेंद्र याठिकाणीं व्यवस्था राखली पाहिजे. निवडणूक बाजवीरीतीनें होत आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे, एकाच वेळीं आंत सोडण्याच्या मतदारांच्या संख्येचें नियमन केलें पाहिजे व खालील इसमाखेरीज, ह्मणजे

(अ) मतस्थानाधिकारी व उमेदवार अगर त्याचा एजंट.

(ब) कामावर असलेले पोलीस अगर इतर सरकारी नोकर व

(क) मतदार तेच आहेत अशी खात्री करून घेण्याकरितां वेळोवेळीं प्रमुख अमलदार आंत घेतील असे सर्व इसम.

याखेरीज इतर कोणाहि इसमास आंत येऊं देतां कामा नये.

(२) कलेक्टर यांनें याबाबतींत ठरविलेल्या वेळेप्रमाणें प्रमुख अमलदारानें मतदानस्थानें खुली व बंद केली पाहिजेत; आणि खुलीं करण्याच्या वेळेपूर्वी अगर बंद झाल्यानंतर कोणाहि मतदारास आंत येऊं देतां कामा नये.

१० या बाबतींत ठरविलेली वेळ पुरी झाल्यानंतर कोणासही मतपत्रिका देतां कामा नये. परंतु, ज्या मतदाराला त्या वेळेपूर्वी मतपत्रिका मिळाली असेल, त्यांनां ठरलेल्या वेळेनंतरहि आपले मत मांडण्यास योग्य संधि दिली पाहिजे.

११ प्रत्येक मतनोंदणीस्थळीं कलेक्टर यांनीं, त्यांना जरूर वाटतील तितक्या, मतदारास आपलीं मतें न दिसतां नमूद करतां येण्यासारख्या बंदिस्त जागा तयार ठेविल्या पाहिजेत

१२ प्रत्येक मतदानकेंद्राचे ठिकाणीं कलेक्टर यांनीं मतपत्रिकेवर खुणा करण्यास पुरेसें साहित्य, जरूर असतील तितक्या मतपत्रिकेच्या पेट्या व त्या जागीं मत देण्याचा हक्क असलेल्या मतदारांचीं नांवें ज्यांत आहेत अशा मतदाराच्या याद्यांच्या अगर त्याच्या भागाच्या नकला पुरविल्या पाहिजेत.

१३ प्रत्येक मतपत्रिकांची पेटी अशी बनविली पाहिजे कीं, कुलूप काढल्याशिवाय मतपत्रिका आंत टाकतां यावी; पण, त्यांतून ती काढतां येऊं नये. मतें घेण्यास सुरुवात करण्याच्या अगोदर मतदानस्थानीं हजर असतील, त्या उमेदवारास अगर त्याचे एजंटास पेटी रिकामी असल्याचे प्रमुख अमलदारानें दाखविले पाहिजे व नंतर त्यावर अशा रीतीनें मोहोर केली पाहिजे, कीं मोहोर फोडल्याशिवाय पेटी उघडतां येऊं नये; व मतपत्रिका टाकण्याकरितां, ती त्यानें आपणांस दिसेल, अशा ठिकाणीं ठेविली पाहिजे. आणि अशा रीतीनें कुलूप घातलेली व मोहोर केलेली पेटी मत-मोजणी होईपावेतों राखली पाहिजे.

३४ मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वीं मतदारांच्या यादींत नमूद केलेला त्याचा नंबर, नांव व वर्णन हें मोठ्यानें सांगितलें पाहिजे व मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर मतदाराचा नंबर लिहिला पाहिजे आणि मतदारांचें यादींत त्या मतदाराचें नावा समोर, त्यास मतपत्रिका दिली आहे हें दाखविण्याकरितां, खूण केली पाहिजे; आणि मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर मतदारसंघाचें नांव व मतदानस्थानाचें अगर केंद्राचें नांव अगर त्याचा विशिष्ट नंबर आणि मतदाराची सही अगर आंगठ्याची निशाणी ही नमूद केली पाहिजे.

३५ मतपत्रिका मिळाल्यानंतर मतदारानें मतदानस्थानांतील एखाद्या खोलींत ताबडतोब गेले पाहिजे व तेथें आपल्या मतपत्रिकेवर खूण करून, मत न दिसेल अशा रीतीनें तीची घडी करून, ती मतपत्रिका मतपत्रिकेच्या पेटींत टाकली पाहिजे प्रत्येक मतदारानें गैरवाजवी विलंब न लावतां आपलें मत देऊन मतदानस्थानांतून बाहेर गेले पाहिजे.

३६ वार्धक्य अगर शारीरिक व्यंग [ Infirmity] अगर अडाणीपणा [Illiteracy] या कारणामुळें ठरविलेल्या रीतीनें मत देण्यास जो असमर्थ असेल, अशा कोणत्याही मतदारास जरूर लागेल ती सर्व मदत प्रमुख अमलदारानें दिली पाहिजे

३७ एखाद्या मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वीं कोणत्याही वेळां प्रमुख अमलदारास अगर मतस्थानाधिकारी यांस, जर तो मतदार तोच आहे याबद्दल अगर त्या ठिकाणीं मत देण्याच्या त्याच्या हक्काबद्दल, संशय घेण्यास पुरेसें कारण असेल तर, त्यास आपण होऊन खालील प्रश्न अशा मतदारास विचारतां येतील. मात्र, उमेदवार अगर त्याचा एजंट यांनीं तशी मागणी केल्यास, ते प्रश्न त्यांनीं विचारलेच पाहिजेत.

१ [ यादींतील नोंद वाचून दाखवून ] नोंद केलेले इसम तुह्मी आहां काय ?

२ या मतदारसंघांतील चालू निवडणुकींत तुह्मी यापूर्वीं मत दिलें आहे काय ?

३ दुसऱ्या कोणत्या मतदारसंघांत तुह्मी मत दिलें आहे ?

या प्रश्नांपैकीं कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर देण्याचें जर त्या मतदारानें नाकारलें, अगर त्यानें पहिल्या प्रश्नाचें अस्तिपक्षी व दुसऱ्या प्रश्नाचें नास्तीपक्षी, आणि तिसऱ्या प्रश्नाचे बाबतींत अस्तिपक्षीं उत्तर दिलें, तर त्यास मतपत्रिका देतां कामा नये.

३८ या भागाच्या शेवटीं जोडलेल्या परिशिष्ट १ मधील नं. १ च्या नमुन्याप्रमाणें मतपत्रिका राहील. तीचे, स्थळप्रत व प्रत्यक्ष मतपत्रिका, असे दोन भाग असतील. यावर अनुक्रम नंबर असतील; व ते अनुक्रम नंबर मतपत्रिकेच्या पुढील बाजूवर व स्थळप्रतीच्या मागील बाजूवर असे छापले जातील.

३९ देऊं केलेली मतपत्रिका — जर एखादा मनुष्य मतदाराचे यादींत नांव नोंदलेला विवक्षित मतदार म्हणून आपणास म्हणवीत असून, तो मतदार म्हणून दुसऱ्या इसमानें मत नोंदल्यानंतर, मतपत्रिकेकरितां मागणी करील, तर त्यास, प्रमुख अमलदारानें विचारलेल्या प्रश्नांचीं त्यानें योग्य उत्तरें दिल्यावर, दुसऱ्या कोणत्याहि मतदाराप्रमाणें मतपत्रिकेवर फुली × खूण करण्याचा त्यास हक्क राहील.

ह्या मतपत्रिकेस देऊं केलेली ( Tendered ) मतपत्रिका असे म्हटले जाईल; व ती मतपत्रिकेचे पेटींत टाकण्याचे ऐवजीं प्रमुख अमलदाराकडे दिली पाहिजे; व त्यानें तिच्यावर त्या मतदाराचें नांव व मतदाराचे यादींतील नंबर व त्या यादीशीं संबंध असेल त्या निवडणुकीच्या स्थानाचें अगर केन्द्राचें नांव ही नमूद केली पाहिजेत. व त्या मतपत्रिका निराळ्या पुडक्यांत ठेविल्या पाहिजेत. व

निवडणूककामगारानें त्या मतपत्रिका मतमोजणींत धरतां कामा नयेत.

मतदाराचें नांव, यादींतील त्याचा नंबर व त्या यादीशीं संबंध असलेल्या मतदानकेन्द्राचें नांव अगर त्या स्थानाचा विशिष्ट नंबर ही या भागास जोडलेल्या परिशिष्टमधील नमुना नंबर २ यादींत दाखल केली पाहिजेत. या यादीस देऊं केलेल्या मतांची याद असें म्हणण्यांत येईल.

अशी मतपत्रिका भरणाऱ्या इसमानें त्यावर आपली सही केली पाहिजे; व पत्ता लिहिला पाहिजे अगर त्या यादींतील नोंदीसमोर आपली निशाणी अगर आंगठा केला पाहिजे.

४० वादग्रस्त मतपत्रिका — मतपत्रिका मागणाऱ्या एखाद्या इसमानें तोतयेपणाचा ( Personation ) गुन्हा केला आहे असें जर एखाद्या निवडणुकीस उभा असलेल्या इसमानें अगर त्याच्या एजंटानें विधान केलें व तें शाबीत करण्याचें पतकरलें, तर प्रमुख अमलदारास त्या मतदार स वादग्रस्तमतांच्या यादींत (Challenged votes list ),

या भागास जोडलेल्या परिशिष्ट ६ मधील नंबर ३ च्या नमुन्या प्रमाणें, आपलें नांव व पत्ता लिहिण्यास अगर, त्यास लिहितां येत नसल्यास, निशाणी अगर आंगठा करण्यास भाग पडतां येईल; व तो इसम अमुकच आहे याबद्दलचा पुरावा पुढें आणण्यासहि त्यास भाग पाडतां येईल व या भागाच्या नियम १७ यांत दिलेल्या पद्धतीनें अशा इसमास प्रश्न विचारल्यावर, जर त्यानें पहिल्या प्रश्नाचें उत्तर 'होय' व बाकीच्या प्रश्नांचें उत्तर 'नाहीं' असें दिलें, तर, त्यास तोतयेपणाच्या शिक्षेची जाणीव करून दिल्यानंतर, मत देण्यास [ मतपत्रिका पेटींत टाकण्यास ] परवानगी दिली पाहिजे. प्रमुख-अमलदारानें या परिस्थितीची नोंद व आपल्या निकालाची नोंद वादग्रस्त मतांच्या यादींत केली पाहिजे.

मात्र, अशा रीतीनें विधान करून तें शाबीत करण्याचें पत्करणारा उमेदवार अगर त्याचा एजंट यांजकडून रु. ५ अमानत मागून घेतले पाहिजेत. ही अमानत रक्कम, चौकशीअंतीं त्याचें विधान खोटें ठरल्यास, सरकारजमा केली पाहिजे.

**खराब मत-पत्रिका**

४१ एखाद्या मतदारानें आपली मतपत्रिका खराब केली (Spoilt) व ती मत-पत्रिका प्रमुख अमलदाराकडे परत केली, तर अशा निष्काळजीपणा न करण्याबद्दल त्यास बजावून, त्या खराब झालेल्या मतपत्रिके-ऐवजीं दुसरी मतपत्रिका त्यास देतां येईल. खराब झालेली मतपत्रिका व त्याची स्थळप्रत यावर प्रमुख अमलदारानें ती मतपत्रिका रद्द झाल्याचा शेरा लिहिला पाहिजे.

४२ एखादा प्रमुख अमलदार अगर मतदानस्थानाधिकारी हा, त्यास ज्या ठिकाणीं मत देण्याचा हक्क नाहीं अशा जागीं मतें घेण्याच्या कामावर असेल आणि दुसऱ्या कोणत्याही मतदारसंघांत मत देण्याचा त्यास हक्क असेल, तर तो कामावर असलेल्या मतदानस्थानीं, कलेक्टर तसा दाखला (परिशिष्ट ७ यांत दिलेल्या नमुन्याप्रमाणें) देईल तर, आपलें मत नमूद करण्यास त्यास परवानगी दिली पाहिजे.

अशा रीतीनें अन्य ठिकाणीं कामावर नेमला गेलेल्या इसमानें कलेक्टरकडे अर्ज करून त्या ठिकाणीं आपलें मत नोंदण्यास त्यांची परवानगी मिळविली पाहिजे. कलेक्टर

यांनीं अशी परवानगी देतांना त्यासोबत ज्या संघांत त्यास मत नोंदण्याचा हक्क आहे, त्या संघाची मतपत्रिका त्यास दिली पाहिजे आणि स्थळप्रतीवर या नियमान्वयें ती मतपत्रिका दिल्याबद्दल शेरा करण्याची तजवीज केली पाहिजे.

तो कामावर नसतां, तर त्यास ज्या ठिकाणीं मत देतां आलें असतें, त्या ठिकाणचें नांव व तें ठिकाण ज्यांत नमूद आहे अशा मतदारसंघाच्या मतदाराच्या यादींतील त्याचा नंबर, हीं दोन्ही मतपत्रिकेचे स्थळप्रतीवर नमूद केलीं पाहिजेत.

४३ अशी मतपत्रिका एका पाकिटांत घालून त्यावर प्रमुख अमलदारानें मोहोर केली पाहिजे व नियम ४१ यांत उल्लेख केलेल्या दाखल्यासह, त्या मतदार-संघाच्या निवडणूककामगाराकडे पाठविली पाहिजे. ती मतपत्रिका कायदेशीर मतपत्रिका आहे, असें समजलें जाईल.

४४ मतनोंदणीचें काम बंद झाल्यावर शक्य तितक्या लवकर प्रत्येक मतदानस्थानांतील प्रमुख अमलदारानें हजर असणाऱ्या उमेदवारानें समक्ष अगर त्यांच्या एजंटासमक्ष खालीलप्रमाणें निरनिराळीं पुडकीं केलीं पाहिजेत; व ज्याची इच्छा असेल, त्या उमेदवाराच्या अगर त्याच्या एजंटाच्या त्या पुडक्यावर माहोरा केल्या पाहिजेत.

१ मत नोंदणीच्या जागीं असलेली मतपत्रिकांची पेटी, कुलूप घातलेली परंतु किल्ली असलेली. २ उपयोगांत न आलेल्या मतपत्रिका. ३ देऊं केलल्या मतपत्रिका. ४ खराब झालेल्या ( Spoilt ) मतपत्रिका. ५ मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत. ६ मतपत्रिकांच्या स्थळप्रती, ७ देऊं केलेल्या मतांची यादी ८ वादग्रस्त मतांची यादी

अशा प्रत्येक पुडक्यावर, त्यांत काय आहे त्याचें वर्णन देऊन, तीं पुडकीं निवडणूककामगार यांजकडे पाठविली पाहिजेत.

४५ या पुडक्याबरोबर प्रमुख अमलदारानें एक पत्रक पाठविलें पाहिजे; व त्यांत त्याच्या स्वाधीन केलेल्या मतपत्रिकांची संख्या दाखल केली पाहिजे व मतदानाचे पेटींतील पत्रिका, उपयोगांत न आलेल्या, खराब झालेल्या, देऊं केलेल्या व या भागांतील नियम ४२ प्रमाणें तजवीज केलेल्या पत्रिका: अशी सदरें पाडून त्यांचा हिशेब दाखविला पाहिजे.

४६ या नियमांत कांहींहि सांगितलें असलें, तरी सबळ कारण असेल, तर कलेक्टर यांची आगाऊ संमति घेऊन निवडणूककामगार यांना मत नोंदण्याची तारीख तहकूब करतां येईल अगर त्याची मुदत वाढवितां येईल; आणि सार्वजनिक शांततेस धोका अगर जलप्रलय (पर्जन्यातिशय) इत्यादींनीं अडथळा उत्पन्न होईल असें वाटल्यास, निवडणूककामगाराची आधि संमति घेऊन, प्रमुख अमलदार यास मतनोंदणी थांबवून त्याच्या पुढील दिवसापर्यंत तें काम बंद ठेवितां येईल. अशा रीतीनें मत नोंदण्याचें काम बंद ठेविलें गेल्यास, त्याबद्दल निवडणूककामगारानें कलेक्टर यास लागलीच रिपोर्टानें कळविलें पाहिजे.

मात्र, मत नोंदण्याचें काम ज्या तारखेपर्यंत बंद अगर तहकूब ठेवण्यांत आलें असेल, ती तारीख निवडणूककामगार यानें त्यास योग्य वाटेल त्या पद्धतीनें मतदारसंघांत प्रसिद्ध केली पाहिजे.

## मतांची मोजणी

४७ मतें घेण्याचें काम संपल्यावर निवडणूककामगारानें शक्य तितक्या लवकर मतें मोजण्याकरितां कलेक्टर यांनीं ठरविलेली तारीख, वेळ व जागा यांची लेखी नोटीस उमेदवारांना अगर त्यांचे एजंटांना दिली पाहिजे.

४८ (१) मतें मोजण्याचे वेळीं निवडणूककामगार व त्यानें त्याकामीं आपल्या मदतीकरितां नेमलेले इसम, तसेंच भाग ५ नियम २५ (अ) प्रमाणें ज्यांना हाजर राहण्याचा हक्क आहे असे इसम, यांखेरीज दुसऱ्या कोणाहि इसमास हजर राहूं देतां कामा नये.

(२) निवडणुकीसंबंधीच्या कोणत्याहि कामाकरितां उमेदवारास अगर त्याच्या तर्फे नेमलेल्या कोणाहि इसमास मतें मोजण्याच्या कामीं मदतनीस म्हणून नेमतां कामा नये.

४९ वरील ४७ व्या नियमाप्रमाणें ठरविलेल्या दिवशीं व वेळीं निवडणूक कामगारानें पुढील तजवीज केली पाहिजे:

(अ) प्रत्येक मतदानस्थानीं ठेवण्यांत आलेली मतपत्रिकांची पेटी अगर पेट्या एकामागून एक उघडल्या पाहिजेत व त्यांतील मतपत्रिका निवडणूक–

कामगारानें बाहेर काढून त्या मोजल्या अगर मोजविल्या पाहिजेत, आणि त्यांची संख्या एका पत्रकांत नमूद केली पाहिजे. हें पत्रक कोणाहि उमेदवारास अगर त्याच्या एजंटास त्यानें दाखवितां कामा नये

(ब) नंतर, निवडणूककामगारानें मतपत्रिकांच्या पेटींतून काढलेल्या सर्व मतपत्रिका एके ठिकाणीं मिसळल्या पाहिजेत व मतें मोजण्याच्या कामीं मदतनीस म्हणून नेमलेल्या इसमांना सोईवार पुडकी करून तीं वाटलीं पाहिजेत.

(क) अशा रीतीनें मतपत्रिका वाटल्यानंतर, पण त्यापूर्वीं नव्हे, निवडणुककामगारानें उमेदवार अगर त्याचे एजंट यांस मतपत्रिका हातांत घेऊं न देतां तपासणी करण्याची योग्य संधि दिली पाहिजे; व पूर्णपणें अगर अंशतः नाकारलेल्या पत्रिकेवर ' नामंजूर केली ' असे शब्द लिहिले पाहिजेत.

त्या ठिकाणीं हजर असलेल्या उमेदवारानें अगर त्याच्या एजंटानें त्या नामंजुरीच्या वाजवीपणाबद्दल शंका उपस्थित केल्यास, निवडणूक कामगारानें नामंजुरीचीं कारणें त्या मतपत्रिकेवर लिहिली पाहिजेत.

कोणत्याही मतपत्रिकेच्या ( स्थळप्रतीच्या ) पाठीवरील अनुक्रम नंबर उमेदवारास अगर त्याचे एजंटास पाहूं देतां कामा नये.

(ड) निवडणूककामगारानें शक्य तोंवर मतें मोजण्याचें काम एकाच बैठकींत केलें पाहिजे; आणि मतें मोजण्याचें काम जर तहकूब ठेवणें भाग पडेल, तर अशा दरम्यानच्या काळांत मतपत्रिका व इतर पुडकीं आणि निवडणुकीसंबंधीं इतर कागद आपल्या ताब्यांत मोहोरबंद करून ठेवले पाहिजेत; व कोणा उमेदवारांना व त्याचे एजंटास त्यावर मोहोर करण्याची इच्छा असेल, तर त्यानांहि त्यावर मोहोर करूं दिली पाहिजे; व त्याच्या रखवालीबद्दल जरूर ती दक्षता घेतली पाहिजे.

५० कोणतीही मतपत्रिका

[अ] जर तीच्यावर नमूद केलेल्या मतांची संख्या भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षां अधिक असेल,

[ब] जर तीच्यावर कोणतेंही मत नमून केलें नसेल,

[क] जर ते अनिश्चितपणामुळें निरर्थक असेल,

[ड] जर तीच्यावर मतदार ओळखला जाण्यासारखी खूण असेल,

तर तीं नामंजूर केलीं पाहिजे.

[२] एखाद्या मतपत्रिकेच्या कायदेशीरपणाबद्दल निवडणूककामगारानें दिलेला निकाल, त्या जागेवर हक्क सांगणाऱ्या उमेदवाराच्या अर्जाच्याबाबतींत उलट निकालास पात्र राहून, अखेरचा असेल.

५१ निवडणूककामगारानें देऊं केलेल्या मतपत्रिकांची व मतदारांच्या यादीच्या स्थळ-प्रतीची मोहोरबंद पुडकीं उघडतां कामा नये. प्रमुखस्थानीं असणाऱ्या अमलदारानें ( Presiding Officer ) ४५ (१) या कलमाप्रमाणें पाठविलेल्या पत्रकाचा खरेपणा, त्यानें मोजलेलीं मतें व नामंजूर केलेल्या मतांची यादी, त्यांच्या संख्येशीं ताडून पाहिला पाहिजे; व प्रत्येक उघडलेलें पुडकें पुन्हां बंद करून त्यावर मोहोर केली पाहिजे, व प्रत्येक पुडक्यावर त्यांतील कागदांचें वर्णन व त्या निवडणुकीबाबतची तारीख लिहिली पाहिजे.

५२ यानंतर निवडणूककामगारानें ( Returning Officer ) पुढील गोष्टी दर्शविणारें एक पत्रक तयार केलें पाहिजे व त्यावर खरेपणाचा दाखला लिहिला पाहिजे:

१ नियम ५१ प्रमाणें खरेपणा ( Verification ) पाहिल्याबद्दलचा निकाल,

२ कायदेशीर मत दिलेल्या उमेदवारांचीं नांवें,

३ प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या कायदेशीर मतांची संख्या,

४ निवडून आलेल्या उमेदवारांचीं नांवें,

५ बेकायदेशीर म्हणून जाहीर केलेल्या मतांची संख्या, आणि

६ देऊं केलेल्या मतांची संख्या,

आणि कोणत्याही उमेदवारास अगर भाग ५ नियम २५ (अ) अन्वयें योग्य-रीतीनें त्यानें अधिकृत केलेल्या त्याच्या एजंटास अगर प्रतिनिधीस सदरहू पत्रकाची नक्कल अगर त्यांतील उतारा घेण्यास परवानगी दिली पाहिजे

# मतपत्रकांची विल्हेवाट.

५३ निकालाचा रिपोर्ट केल्यानंतर निवडणूककामगारानें ५१ व्या कलमांत सांगितलेलीं पत्रकें व पुडकीं आणि निवडणुकीसंबंधीं इतर सर्व कागद आपल्या ताब्यांत ठेविले पाहिजेत.

५४ निवडणूककामगार यांचे ताब्यांत असतांना मोजलेल्या, नामंजूर केलेल्या अगर देऊं केलेल्या मतपत्रिकांचीं अगर त्याच्या स्थळप्रतीचीं आणि निवडणुकीच्या यादीचीं, व खुणा केलेल्या प्रताचीं पुडकीं एकाद्या लायक कोर्टाच्या हुकुमाशिवाय उघडतां अगर कोठेही हजर करितां कामा नयेत. परंतु, निवडणुकीच्या बाबतींत, वरील शिवाय इतर सर्व कागदपत्र, ल्यॉंड-रेव्हिन्यू कोडांत कागदपत्रांच्या पाहणीसंबंधीं ठेवण्यांत आलेली फी दिल्यास, सर्व लोकांस पाहण्यासाठीं खुलें असले पाहिजेत [ परिशिष्ट नंबर ८ ].

५५ वर नमूद केलेलीं पुडकीं एक वर्षपयत ठेविलीं पाहिजेत; व लायक कोर्टानें विरुद्ध हुकूम केला नसेल, तर नंतर त्यांचा नाश केला पाहिजे.

निवडणुच्या कागदांची सुरक्षित रखवाली, संरक्षण,

तपासणी व ते हजर करणे.

५६ (१) खालीं दिलेल्या तक्त्यातील पहिल्या रकान्यांत नमूद केलेले कागद, दुसऱ्या रकान्यांत सांगितलेल्या अमलदारांने, तिसऱ्या रकान्यांत सांगितलेल्या मुदतीपर्यंन ठेविले पाहिजेत.

(२) या तक्त्यांतील नोंद नंबर १, ३, ४ अ, ब, आणि ५ यांत नमूद केलेले कागदपत्र सर्वांना पाहण्यास खुले असले पाहिजेत.

## तक्ता, निवडणुकीचे कोणते कागद किती कालपर्यंत ठेवावयाचे याबाबत

| कागद अगर रेकार्ड यांचें वर्णन | कोणी ठेवावयाचे | किती कालपर्यंत ठेवावयाचे |
|---|---|---|
| १ भाग ४ नियम १० अन्वयें प्रसिद्ध झालेली मतदारांची प्राथमिक यादी | कलेक्टर | एक वर्ष |
| २ हक्क-हरकती तक्रारींसंबंधीं नियमाप्रमाणें कलेक्टर यांजकडे केलेले अर्ज | ,, | ,, |
| ३ मतदारांच्या अखेरच्या यावा. * | ,, | * ५ वर्षे अगर नवीन शेवटची अशीच याद प्रसिद्ध होईपर्यंत. |
| ४ खालील किरकोळ कागद | | |
| अ नेमणुकीचे कागद | | एक वर्ष |
| ब उमेदवारी परत घेण्याबद्दलचे कागद | संबंधीं मतदारसंघाचा निवडणूक-कामगार | ,, |
| क भाग ६ चे नियम ४९ यांत नमूद केलेले कागद | | ,, |
| ५ प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या निवडणुकीसंबंधीं भाग ९ नियम ७० अन्वयें सादर केलेले निवडणुकीचे तक्रारी अर्ज, त्यावरील डिस्ट्रिक्ट जज्ज यांचे ठराव व घेतलेला पुरावा. | डिस्ट्रिक्ट जज्ज | ,, |
| ६ भाग ६ नियम २६ अन्वयें उमेदवारानें झालेल्या खर्चाबद्दल सादर केलेलें पत्रक. | निवडणूककामगार | ,, |

## भाग सातवा

## नेमलेल्या (Nominated) सभासदांची लायकी

५७ भाग २ नियम ४ यांत सांगितल्याप्रमाणें कायदेमंडळाच्या निवडणुकीस उभे राहण्याची ज्याची लायकी नसेल, असा इसम नेमला जाणार नाहीं.

मात्र, इतकेंच कीं, असा इसम संस्थानचा रहिवासी अगर प्रजाजन असण्याची जरूरी नाहीं.

५८ (१) कोणताही नेमलेला बिनअधिकारी सभासद प्रातिनिधिक कायदेमंडळाची मुदत संपेपर्यंत कायदेमंडळाच्या सभासदत्वाच्या हुद्यावर राहील.

(२) कोणताही अधिकारी सभासद प्रातिनिधिक कायदेमंडळाची मुदत संपे-पर्यंत, अगर त्याच्या नेमणुकीच्यावेळीं श्रीमंत राजेसाहेब ठरवितील तितक्या मुदतीपर्यंत, सदर हुद्यावर राहील.

## भाग आठवा

## सर्वसाधारण तरतुदी

५९ प्रातिनिधिक कायदेमंडळाचा सभासद ह्मणून निवडून आलल्या प्रत्येक इसमानें आपल्या जागेवर बसण्यापूर्वी प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या सभेंत श्रीमंत राजेसाहेब यांच्याशीं राजनिष्ठ राहण्याबद्दल खालील शद्बांत शपथ घेतली पाहिजे अगर प्रतिज्ञा केली पाहिजे.

मी अ, ब, या कायदेमंडळाचा निवडलेला–नेमलेला–सभासद विधिपूर्वक शपथ घेतो अगर प्रतिज्ञा करितो, कीं भोर संस्थान आणि संस्थानाधिपति व त्यांचे वारस यांच्याशीं मी इमानानं वागेन व त्यांचे ठिकाणीं खरी राजनिष्ठा ठेवीन, व जें काम करण्यास मी आतां लागणार आहे तें मी इमानानें करीन.

### जागा रिकामी होण्याबाबत

६० निवडलेला अगर नेमलेला एखादा सभासद निवडणुकीनंतर अगर नेमणुकीनंतर व भाग २ नियम ४ पोट नियम (१) कलम (अ) ते (क) यांतील नालायकीस पात्र होईल अगर

जागा रिकामी होणें

पुन्हां तो नियम ५९ यांत ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें शपथ घेण्याचे अगर प्रतिज्ञा करण्याचें नाकारील, तर त्याची जागा रिकामी केल्याचें जाहीर केले जाईल.

६१ एखाद्या निवडलेल्या सभासदाचें बाबतींत त्याची निवडणूक रद्द ठरविल्यामुळें अगर मृत्यु, सरकारी नोकरीचा स्वीकार अगर योग्यरीतीनें मंजूर झालेला राजीनामा इत्यादी कारणामुळें जर त्याची जागा रिकामी झाल्याचें ( Vacant ) जाहीर करण्यांत आलें असेल, तर कलेक्टर यांनीं गॅझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून सदर जाहीरनाम्यांत ठरविलेल्या काळांत ती जागा भरण्यासाठीं इसम निवडावा असें, तो ज्या मतदारसंघांतून निवडून आला असेल, त्या मतदारसंघास फर्माविलें पाहिजे. ही पोट-निवडणूक ( By-election ) असेल.

**प्रसंगोपात्त जागा रिकामी होणें**

६२ एखाद्या मतदारसंघांत एखाद्या सभासदाची जागा रिकामी झाल्यास व त्या मतदारसंघानें सभासद निवडण्यास फर्माविलें असूनहि निष्काळजीपणामुळें अगर बुद्धीपुरःसर सभासद निवडून न दिल्यास, ती जागा रिकामी राहिली असें समजण्यांत येईल

**निवडून देण्याचें टाळणें**

६३ नेमलेल्या सभासदांचें बाबतींत जागा रिकामी झाली असेल, तर जरूर ती लायकी असणाऱ्या इसमास या नियमान्वयें श्रीमंत सरकार राजेसाहेब यांना त्या जागेवर नेमतां येईल.

## सामान्य निवडणुकी

६४ (१) कायदेमंडळाची मुदत संपल्यानंतर अगर त्याचें बिसर्जन ( Dissolve ) झाल्यावर, नवीन कायदेमंडळ बनविलें जावें, म्हणून सामान्य निवडणूक केली पाहिजे; व त्याकरितां

(२) गॅझेटांत प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याच्या द्वारे नियम ३ यांत उल्लेख केलेल्या मतदारसंघांत, त्या जाहीरनाम्यांत ठरविलेल्या मुदतींत, या नियमान्वयें सभासद निवडण्यास श्रीमंत राजेसाहेब यांना फर्माविता येईल

मात्र, इतकेंच कीं, जर श्रीमंत राजेसाहेब यांना योग्य वाटेल, तर त्यांना कायदेमंडळाची मुदत आपोआप ज्या तारखेस संपणार असेल, त्यापूर्वी तीन महिन्याहून अधिक नाहीं अशा कोणत्याहि वेळीं असा जाहीरनामा काढतां येईल.

६५ सभासदांच्या निवडणूकीकरितां नेमलेली मुदत सपल्यावर, शक्य तितक्या लवकर, अशा कोणत्याहि निवडणुकींत निरनिराळ्या मतदारसंघांतर्फे निवडून आलेल्या सभासदांचीं नांवें गॅझेटांत जाहीर केलीं पाहिजेत.

६६ एखादा मतदारसंघाची याद अगर अशा यादीस जोडलेल्या दुरुस्त्यांची याद तयार करण्याचे बाबतींत जर कोणतीहि अडचण उत्पन्न होईल, तर ती याद योग्य रीतीनें तयार करण्याकरितां अगर प्रसिद्ध करण्याकरितां अगर निवडणूक योग्य रीतीनें होण्याकरितां जरूर दिसेल, ती, या सर्व नियमांशीं विसंगत नसलेली, कोणतीहि गोष्ट श्रीमंत राजेसाहेब यांना लेखी हुकूमानें करितां येईल.

६७ मतदारांच्या यादींत नोंदलेल्या एखाद्या इसमाबद्दल, तो इसम तोच आहे किंवा नाहीं अशी छापणाऱ्याच्या अगर लिहिणाऱ्याच्या चुकीमुळें शंका उत्पन्न होत असेल, तर त्या शंकेचा निकाल प्रमुख अमलदार अगर निवडणुककामगार यांना लावतां येईल व त्यास अनुसरून यादींत दुरुस्ति करिता येईल.

पण, नवीन इसमाचें नांव अशा दुरुस्तीनें त्यास यादींत दाखल करितां येणार नाहीं.

## भाग ९ वा

---

# निवडणुकीच्या योग्यपणाबद्दल शंका व वाद यांचा निकाल

६८ या भागांत व परिशिष्ट २ यांत विषयाला अगर संदर्भाला बाध येत नसेल, तर

(अ) 'उमेदवार' या संज्ञेचा अर्थ एखाद्या निवडणुकींत उमेदवार म्हणून ज्याची, नॉमिनेशन पेपरची छाननी होऊन, नेमणूक झाली असा इसम, अगर आपली अशी नेमणूक झाली आहे असें सांगणारा अगर ती वाजवी कारणाशिवाय नाकबूल करण्यांत आली आहे असें सांगणारा

इसम, असा आहे; आणि जो इसम भावी निवडणुकीमध्यें आपण उमेदवार म्हणून उभे राहणार आहोंत असें जाहीर करील–मात्र, अशा इसमाची पुढें निवडणूक होईल, तेव्हां उमेदवार म्हणून नेमणूक झाली पाहिजे.–अशा इसमाचा 'उमेदवार' या संज्ञेत समावेश होतो असें समजावें.

(ब) 'निवडणुकीबद्दलचा हक्क' या संज्ञेचा अर्थ एखाद्या निवडणुकींत एखाद्या इसमाचा उभे राहण्याचा अगर न राहण्याचा अगर उमेदवारी परत घेण्याचा अगर मत देण्याचा अगर मत देण्यापासून अलिप्त राहण्याचा हक्क असा समजावा.

(क) 'निवडून आलेला उमेदवार' या संज्ञेचा अर्थ या नियमाअन्वयें योग्य रीतीनें निवडलेला उमेदवार म्हणून ज्याचें नांव स्टेट गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे असा इसम, असा समजावा.

६९ या भागांत निर्देश केलेल्या नियमांतील कारणांस अनुसरून असलेल्या निवडणुकीच्या अर्जांचे द्वाराव्यतिरिक्त इतर कोणत्याही रीतीनें निवडणुकीबद्दल वाद उपस्थित करितां येणार नाहीं.

७० [१] एखाद्या निवडून आलेल्या उमेदवाराविरुद्ध निवडणुकीसंबंधीं तक्रारी अर्ज डि० जज्ज यांजकडे कोणाहि उमेदवारास अगर मतदारास अगर श्रीमंत राजेसाहेब यांनीं अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास करता येईल.

निवडणुकीचा तक्रारी अर्ज कोणास करतां येईल

असा अर्ज

(अ) नियम २६ अन्वयें सांगितलेले त्या उमेदवाराच्या निवडणुकीचे खर्चाचें पत्रक आणि त्यासंबंधीं प्रतिज्ञालेख निवडणूककामगार ( Returning Officer ) यांच्याकडे पोहोचल्यातारखेपासून, अगर

(आ) निवडून आलेला उमेदवार अगर त्याचा एजंट अगर आपल्याकरितां कोणी काम करीत आहे हें माहीत असून त्याच्याकडे वरील दोघे डोळेझांक करीत आहेत असा कोणताहि त्रयस्थ इसम, याजवर, निवडणुकीसंबंधीं गैरवाजवी दाब, लांचलुचपतीचें कृत्य अगर तोतयेपणा या गुन्ह्याबद्दल इंडियन पिनल कोड भाग ९ (अ) यांत दिलेल्या व्याख्येनुसार दोषी आहे अशा कारणांवरून, अशा गुन्ह्याची शाबिती झाल्यादिवसापासून

चौदा १४ दिवसाचे आंत करितां येईल, अगर

(इ) मात्र, या बाबतींत श्रीमंत राजेसाहेब यांनीं अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, गैरवाजवी दाब अगर लांचलुचपत यांचा उपयोग झाल्याची पुष्कळ उदाहरणें ( Large number of cases ) झाली असल्याकारणामुळें ती निवडणूक वाजवी व योग्य नव्हती या कारणास्तव, वरील [अ] कलमांत सांगितलेल्या तारखेपासून तीस ३० दिवसाचें आंत करता येईल.

(२) एखाद्या निवडणुकीचा तक्रारी अर्ज डि० जज्ज यांजकडे अगर त्यांनीं त्याबाबतींत अधिकृत केलेल्या कोणाहि अमलदाराकडे,

(अ) अर्ज करणाऱ्या इसमानें समक्ष दिला असल्यास, अगर

(ब) अर्ज करणाऱ्या इसमानें लेखी अधिकार दिलेल्या दुसऱ्या इसमानें, समक्ष दिल्यास, अगर

(क) रजिस्टर पोष्टानें, पाठविला असल्यास

तो डि. जज्ज यांना सादर केला असें समजण्यांत येईल

(३) या नियमाप्रमाणें निवडणुकीबद्दल तक्रारी अर्ज सादर करण्याचा अखेरचा दिवस गॅझेटमध्यें सुट्टीचा म्हणून जाहीर झालेला असेल, तर तो अर्ज गॅझेटमध्यें सुट्टी नसलेल्या अगर सुट्टी म्हणून जाहीर न केलेल्या अशा दुसऱ्याच दिवशीं दिला अगर पोंचला, तर तो ठरविलेल्या मुदतींत सादर केला, असें समजण्यांत आलें पाहिजे.

**अर्जांतील मजकूर**

: [१] ज्या महत्वाच्या गोष्टींवर अर्जदार याची भिस्त असेल, त्याचें संक्षिप्त स्वरूपांत कथन त्या अर्जांत असलें पाहिजे, व जरूर तेथें त्याचे प्यारिग्राफ [ भाग ] पाडून त्यास अनुक्रम नंबर दिले पाहिजेत; व सन १९०८ इ. चे सिव्हिल प्रोसीजर कोडमध्यें दावा अर्जाचें खरेंपणाबद्दल ठरविलेल्या पद्धतीप्रमाणें, अर्जदारानें त्या अर्जावर सही करून खरेपणाबद्दल प्रतिज्ञालेख केला पाहिजे.

[२] त्या अर्जासोबत अर्जदाराच्या मतें घडलेल्या कोणत्याहि लांचलुचपतीचें कृत्याचा पूर्ण तपशील असलेली वरीलप्रमाणें सही केलेली व खरेपणाबद्दल प्रतिज्ञा केलेली, यादी असली पाहिजे.

त्यांत असें लांचलुचपतीचें कृत्य ज्यांनीं केल्याचें ह्मणणें असेल, त्या पक्षकारांचीं नांवें व तें केल्याची तारीख व जागा याबद्दल शक्य तितकें पूर्ण कथन असलें पाहिजे.

अर्जदारानें सामनेवाले ह्मणून त्यांत ज्यांचा समावेश केला असेल, त्या सर्वांना देण्यासाठीं तितक्या अर्जाच्या नकला पुरविल्या पाहिजेत.

७२ निवडून आलेल्या उमेदवाराच्या निवडणुकीबद्दल प्रश्न उपस्थित करून, शिवाय

**कोणाविरुद्ध अर्ज सादर करावयाचा**

अर्जदार यास—त्याची इच्छा असल्यास—तो स्वतः अगर दुसरा कोणीही उमेदवार योग्य रीतीनें निवडून आला आहे, असें ठरविण्यांत यावें अशीही मागणी करितां येईल. अशा प्रसंगीं ज्यांची नेमणूक झाली आहे, असे बाकीचे सर्व उमेदवार त्या अर्जांत सामनेवाले ह्मणून दाखल केले पाहिजे.

७३ अर्ज सादर करण्याच्या वेळीं अर्जदार यानें, नियम ७० पोट नियम [१] कलम

**अर्जाचें खर्चासाठीं तारण**

[इ] याखालीं केलेल्या अर्जाखेरीज, इतर प्रसंगीं त्या अर्जाचें खर्चाकरितां तारण ह्मणून १०० शंभर रुपयाची रक्कम रोख हजर केली पाहिजे.

७४ नियम ७०, ७१ व ७३ यांतील शर्ती जर पाळण्यांत आल्या नसतील, तर डि. जज्ज यांनें तो अर्ज काढून टाकला पाहिजे.

७५ नियम ७३ प्रमाणें जर असा अर्ज काढून टाकला नाहीं, तर डि० जज्ज यानें शक्य तितक्या लवकर प्रत्येक सामनेवाल्यावर अर्जाच्या नोटिशीची बजावणी केली पाहिजे, व गॅझेटांत त्याची प्रसिद्धी केली पाहिजे आणि पुढील खर्चासाठीं आपल्यास योग्य वाटेल तितक्या रकमेचा जातमुचलका, एक अगर अधिक जामिनासह, देण्याबद्दल त्यांत अर्जदारास हुकूम करितां येईल.

अशा प्रसिद्धीनंतर १४ दिवसांचे आंत दुसऱ्या कोणत्याही उमेदवारास, तितक्याच रकमेचा जामीन व तितक्याच रकमेचा जातमुचलका देऊन, आपणास सामनेवाला ह्मणून त्यांत सामील करून घेतां येईल.

मात्र, इतकेंच कीं, नियम ७० [इ] प्रमाणें जेव्हां अर्ज करण्यांत आला असेल, अशा कोणत्याही प्रसंगीं अर्जदार यांजकडून असा जामीन अगर जातमुचलका मागतां कामा नये.

७६ या नियमाचें इतर (खालील) शर्तीस पात्र राहून, प्रत्येक निवडणुकीच्या अर्जाची चौकशी करण्यास डि॰ जज्ज यांस दाव्याची चौकशी करणारें दिवाणी कोर्ट असें मानण्यांत येईल; व त्यांस त्या ॲक्टाखालील जरूर ते सर्व अधिकार असतील, आणि त्यांनीं होतां होईल तों सन १९०८ इ. चे सिव्हिल प्रोसीजर कोडप्रमाणें दाव्याचे चौकशीस लागू असलेल्या पद्धतीनें, पण संक्षिप्त रीतीनें (Summary Manner), सदर अर्जाची चौकशी केली पाहिजे.

मात्र, इतकेंच कीं

(अ) डि. जज्ज यानें तपासलेल्या कोणत्याहि साक्षीदाराच्या पुराव्याचें फक्त सारांशाचें टिपण केलें म्हणजे झालें.

(ब) स्टँपॲक्ट आणि रजिस्ट्रेशनॲक्ट यामध्यें कांहींहि सांगितलेलें असलें, तरी कोणताही कागद पुराव्यांत अग्राह्य मानला जाणार नाहीं.

(क) कोणत्याहि सवालांचें योग्य व लागू अशा प्रश्नाचें उत्तर देण्याची माफी साक्षीदारास मिळणार नाहीं तथापि, कोणत्याहि सभासदास त्यानें कोणास मत दिलें, हें सांगण्यास भाग पाडलें जाणार नाहीं.

(ड) वकिलांची फी डि. जज्जाच्या पसंतीप्रमाणें आकारण्यांत येईल, व

(इ) या आणि इतर खर्चाच्या बाबतींत हुकुमाची बजावणी हुकुमनाम्याच्या बजावणीप्रमाणें करण्यांत येईल.

७७ (१) डि. जज्जाच्या परवानगीनें निवडणुकीचा अर्ज परत घेतां येईल.

यांप्रमाणें अर्ज परत घेण्यास मंजुरी देतांना विरुद्धबाजूचा त्यावेळपावेतों जो खर्च झाला असेल तो, अथवा डि. जज्ज यांस वाटेल असा, वाजवी खर्च अर्जदाराकडून विरूद्धबाजूस देण्याचा हुकुम करता येईल.

पण, असा अर्ज जर डि. जज्जाच्या मतें किफायतीचा धंदा म्हणून अगर मोबदल्याचें करारानें करण्यांत आला असेल, तर तो तक्रार परत घेण्याबद्दलचा अर्ज मंजूर करण्यांत येणार नाहीं.

(२) अनेक अर्जदारांनीं मिळून असा अर्ज केला असेल, तर त्या सर्वांच्या संमतीवाचून, तसेंच, खर्चाचा आणि मोबदल्याच्या प्रश्नाचा विचार केल्याविना, तो परत घेण्याचा अर्ज मंजूर करण्यांत येणार नाहीं.

[अ] अर्ज मंजूर केल्यास, तो परत घेतल्याबद्दलची नोटीस डि. जज्ज यांनीं गॅझेटांत प्रसिद्ध केली पाहिजे; आणि

[ब] अशा प्रसिद्धीपासून ४ दिवसांचें आंत, जो स्वतः अर्जदार होऊं शकला असतां, अशा कोणत्याहि इसमास असा अर्ज परत घेणाऱ्या इसमाचें जागीं अर्जदार ह्मणून आपलें नांव घालावें असा अर्ज करतां येईल; व नियम ७२ प्रमाणें तारणाबद्दलची अट त्यानें पुरी केल्यावर, असं नांव दाखल करून घेतां येईल; व डि. जज्ज यांस योग्य वाटेल त्या [ नियम ७५ प्रमाणें ] अटीवर तें काम पुढें चालवितां येईल.

**अर्जाच्या चौकशीचें काम केव्हां बंद पडेल.**

७८ [१] एकटाच अर्जदार असेल, तर त्याच्या मृत्यूनंतर व अनेक अर्जदार असतील तर त्यांच्यापैकीं शेवटच्या, ह्मणजे अखेर हयात असणाऱ्याच्या, मृत्यूनंतर निवडणुकीच्या अर्जाचें काम बंद पडेल.

मात्र, असा एकटाच अर्जदार जर नियम ७० [१] [इ] अन्वयें नेमलेला अमलदार असेल, तेव्हां श्रीमंत राजेसाहेब यांनीं अधिकृत केलेल्या, दुसऱ्या कोणत्याहि अधिकाऱ्यास तें काम पुढें चालवितां येईल.

[२] निवडणुकीच्या अर्जाच्या चौकशीचें काम बंद पडल्याची नोटीस डि. जज्ज यांनीं गॅझेटांत प्रसिद्ध केली पाहिजे.

[३] अशा प्रसिद्धीपासून १४ दिवसांचें आंत, जो स्वतः अर्जदार होऊं शकला असतां, अशा कोणाहि इसमास अर्जदाराचें जागीं आपलें नांव घालण्याकरितां अर्ज करतां येईल; व तारणाबद्दलची अट त्यानें पुरी केल्यावर डि. जज्ज यांस योग्य वाटेल त्या अटीवर असें नांव दाखल करून घेतां येईल व ते काम पुढें चालवितां येईल.

**सामनेवाल्याच्या मृत्यूमुळें**

७९ निवडणुकीच्या अर्जाची चौकशी पुरी होण्यापूर्वी जर सामनेवाला मयत होईल अगर अर्जाविरुद्ध काम चालवावयाचें नाहीं अशी नोटीस देईल, तर डि. जज्ज यांनीं याबद्दलची नोटीस गॅझेटांत प्रसिद्ध केली पाहिजे; व त्यानंतर, अशा प्रसिद्धीपासून १४ दिवसांचें आंत, जो

**काम बंद पडणें अगर दुसऱ्याचें नांव दाखल करणें** अर्जदार होऊं शकला असतां अशा कोणत्याहि इसमास अशा सामनेवाल्याच्या जागीं, त्या अर्जास विरोध करण्याकरितां, आपलें नांव घालावें असा अर्ज करतां येईल; व डि. जज्ज यांस योग्य वाटेल त्या अटीवर तें काम पुढें चालविण्याच्या अधिकार आहे.

८० (१) निवडणुकीच्या अर्जाच्या चौकशींत, जेव्हां निवडून आलेल्या उमेदवारा-

**जागेवर हक्क सांगणाऱ्यावर उलट दोषारोप** खेरीज दुसरा उमेदवार आपला हक्क सांगत असेल, तेव्हां तो निवडून आलेला उमेदवार अगर दुसरा कोणताहि पक्षकार यास, असा तक्रार करणारा उमेदवार जर निवडून आला असतां व त्याचे निवडणुकीविरुद्ध जर अर्ज आला असतां, तर त्याची निवडणूक रद्द झाली असती हे शाबीत करण्याकरितां पुरावा देतां येईल.

मात्र, इतकेंच कीं, तो निवडून आलेला उमेदवार अगर वर नमूद केलेला असा दुसरा पक्षकार, यानें नियम ७९ व नियम ७३ अन्वयें अनुक्रमें निवडणुकीच्या अर्जाच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसाचें आंत जर आपल्या इराद्याची नोटीस डि. जज्ज यांस देऊन अमानत ठेविली नसेल व जातमुचलका दिला नसेल, तर तसा पुरावा त्यास देतां येणार नाहीं.

(२) पोटनियम [१] यांत उल्लेख केलेल्या नोटिशीबाबत निवडणुकीच्या बाबतींत नियम ७१ प्रमाणें जरूर असलेलें कथन व तपशिलाची याद असली पाहिजे, व त्याप्रमाणें त्यावर सही करून खरेपणाबद्दल प्रतिज्ञा लेख केला असला पाहिजे.

८१ निवडणुकीच्या अर्जाच्या चौकशीच्या वेळीं डि. जज्ज तसा हुकूम करतील,

**कायदे-अमलदारानें हजर राहणें** तर सरकारी वकील अगर त्यांजकडून माहिती घेऊन काम करणारा दुसरा इसम अगर पब्लिक प्रॉसिक्युटर यानें हजर राहून, डि. जज्ज फर्मावितील त्याप्रमाणें, कामांत भाग घेतला पाहिजे.

८२ या नियमांत पुढे केलेल्या तरतुदीखेरीज डि. जज्ज यांच्या मतें,

निवडणूक रद्द ठरविण्याचीं कारणें

(अ) निवडून आलेल्या उमेदवाराची निवडणूक लांचलुचपती-च्या कृत्यानें घडवून आणली असेल अगर लांचलुचपतीच्या कृत्यांच्या योगें निवडणुकीच्या निकालावर विशेष परिणाम घडून आला ( Materially affected ) असेल, अगर

(ब) परिशिष्ट दोन २ चा भाग १, यांत नमूद केलेलें लांचलुचपतीचें कृत्य घडले अगर केले असेल, अगर

(क) एकादि नेमणूक अयोग्य रीतीनें कबूल अगर नाकबूल करण्यांत आल्यामुळें अगर एकादें मत अगर मतें अयोग्य रीतीनें घेतल्यामुळें अगर नाकारल्यामुळें अगर एखादें रद्द असणारें मत स्वीकारल्यामुळें अगर या खालील नियमांच्या शर्ती कोणत्याहि रीतीनें न पाळल्यामुळें अगर यांत जोडलेल्या कोणत्याहि नमुन्याचा उपयोग करण्यांत कोणतीहि चूक झाल्यामुळें निवडणुकीच्या निकालावर विशेष परिणाम घडून आला असेल,

[ड] परीशिष्ट २ दोनचा भाग १ अगर २ यांत निर्देशिल्याप्रमाणें गैरवाजवी दाब अगर लांच यांचा उपयोग केल्याची पुष्कळ उदाहरणें घडून आल्यामुळें ती निवडणुक खुली (Free ) झाली नसेल,

तर निवडून आलेल्या उमेदवाराची निवडणूक रद्द होईल.

८३ चौकशी संपल्यावर तो निवडून आलेला उमेदवार अगर या नियमांच्या शर्तीप्रमाणें

डि. जज्जाचा रिपोर्ट व त्यापुढील काम

त्या जागेवर ज्यानें हक्क सांगितलेला असेल असा त्या अर्जाचें कामातील दुसरा कोणताही पक्षकार, हा योग्य रीतीनें निवडून आला आहे किंवा नाहीं याबद्दल डि. जज्जानें निकाल दिला पाहिजे;

व त्याचा निकाल अखेरचा समजला जाईल.

हा निकाल डि. जज्जानें कलेक्टर यांस कळविला पाहिजे व कलेक्टरनें तो रिपोर्ट गॅझेटमध्यें प्रसिद्ध केला पाहिजे.

## भाग १० वा

८४. मतनोंदणीच्या कामावर अगर मतमोजणीच्या कामगिरीवर असणाऱ्या प्रत्येक अमलदार, कारकून, अगर इसम यांनीं मतदानाचें बाबतींत गुप्तपणा राखला पाहिजे व राखण्याचें कामीं मदत केली पाहिजे; आणि कोणत्याहि कायद्यानें अगर कायद्याखालीं परवानगी असलेल्या कारणाखेरीज गुप्तपणास बाध येईल, अशी कोणतीहि माहिती कोणाहि इसमास देतां कामा नये.

# परिशिष्ट १ लें
## मतदारसंघाची यादी

| मतदारसंघाचें नांव | मतदारसंघाचा वर्ग | | | | मतदारसंघाची व्याप्ती | निवडून यावयाच्या सभासदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | सामान्य | | विशिष्ट | संयुक्त | | |
| | ग्रामीण | नागर | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ भोर शहर | | ,, | | | भोर म्यु. चें क्षेत्र | १ |
| २ विचित्रगड ताल्लुका | ,, | | | | भोरखेरीज सर्व गांवें | २ |
| ३ राजगड ताल्लुका | ,, | | | | सर्व गांवें | २ |
| ४ प्रचंडगड ताल्लुका | ,, | | | | सर्व गांवें | २ |
| ५ पवनमावळ ताल्लुका | ,, | | | | सर्व गांवें | २ |
| ६ सुधागड ताल्लुका | ,, | | | | सर्व गांवें | २ |
| ७ इनामदार संघ | | | ,, | | सर्व संस्थानचें क्षेत्र | १ |
| ८ हरिजनांकरितां संयुक्त-मतदारसंघ | | | | ,, | नागर, ग्रामीण व विशिष्ट मिळून | १ |
| | | | | | | १२ |

## परिशिष्ट २ रें

# लाचलुचपतीचीं कृत्यें

या नियमांच्या कारणांकरितां भाग १ व २ यांत सांगितलेल्या खालील गोष्टी लांचलुचपतीचीं कृत्यें ह्मणून मानण्यांत येतीलः

### भाग १ ला

१ एखाद्या उमेदवारानें अगर त्याच्या एजंटानें अगर, आपल्याकरितां कोणी काम करीत आहे हें माहीत असून त्याच्याकडे वरील दोघे डोळेझांक करीत आहेत, अशा कोणत्याही त्रयस्थ इसमानें

(अ) एकाद्या इसमानें उमेदवार ह्मणून उभे राहण्याकरितां अगर न राहण्याकरितां अगर उमेदवारी परत घेण्याकरितां, अगर

(ब) एकाद्या मतदारास मत देण्याकरितां अगर मत देण्यापासून परावृत्त करण्याकरितां, अगर

बक्षिस ह्मणून

(१) एकादा इसमास उभे राहिल्याबद्दल अगर न राहिल्याबद्दल अगर आपली उमेदवारी परत घेतल्याबद्दल, अगर

(२) एकाद्या मतदारानें एकाद्या निवडणुकींत मत दिल्याबद्दल अगर मत देण्यापासून अलिप्त राहिल्याबद्दल

प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें कोणाहि इसमास त्याचें मन वळविण्याच्या हेतूनें संतोष करण्याकरितां कोणतीहि वस्तू देणें अगर देण्याचें वचन देणें अगर कोणतीहि वस्तू देऊं करणें.

खुलासा:-- या कलमाच्या कारणांकरितां 'संतोष करणें' (Gratification) ही संज्ञा प्रत्यक्ष पैसा अगर ज्याचें मोजमाप पैशांत करता येईल इतक्यापुरती मर्यादित नसून, तीच्यांत पाहुणचार, करमणूक, मेजवानी वगैरे आदरातिथ्याचे सर्व प्रकार व बक्षिसाचे सर्व प्रकार यांचा समावेश होतो.

परंतु कोणत्याहि निवडणुकीमध्यें अगर निवडणुकीच्या कारणांकरितां प्रामाणिकपणें केलेल्या आणि या नियमांत निर्दिष्ट केलेल्या निवडणुकीच्या खर्चाच्या पत्रकांत योग्य रीतीनें नमूद केलेल्या कोणत्याहि खर्चाचा या संज्ञेत समावेश होत नाहीं.

२ गैरवाजवी दाब, ह्मणजे एकादा उमेदवारानें अगर त्याच्या एजंटान अगर,

**गैरवाजवी दाब** आपल्या वतीनें कोणी काम करीत आहे हें माहीत असून त्याच्याकडे वरील दोघे डोळेझांक करीत आहेत, अशा कोणाहि त्रयस्थ इसमानें कोणत्याहि निवडणुक-हक्काचा स्वःच्या इच्छेनुसार ( Free ) उपयोग करण्याच्या कामीं, प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष, ढवळाढवळ ( Interference ) करणें अगर ती करण्याचा प्रयत्न करणें.

खुलासा:-- यांतील कलम ७४ व यांत सांगितल्याप्रमाणें गोष्टीस बाध न येतां वर उल्लेख केलेला जो कोणी इसम

(अ) एकाद्या उमेदवारास अगर मतदारास अगर, ज्याच्याशीं एकाद्या उमेदवाराचा अगर मतदाराचा कसलाहि हितसंबंध आहे, अशा इसमास कोणत्याहि प्रकारची इजा करण्याची धमकी देईल, अगर

(ब) एकादा उमेदवार अगर मतदार अगर त्याचा हितसंबंध आहे असा कोणीहि इसम ईश्वरी अवकृपेस अगर पारमार्थिक दृष्ट्या [Spiritually] निंदेस पात्र होईल अगर केला जाईल असें ह्मणून एकाद्या उमेदवाराचें अगर मतदाराचें मन वळवील अगर वळविण्याचा प्रयत्न करील,

तो या कलमाच्या अर्थाप्रमाणें अशा उमेदवाराच्या अगर मतदाराच्या निवडणुकीसंबंधीं हक्क-बजावणीच्या कामीं ढवळाढवळ ( Interference ) करतो असें मानलें जाईल.

(क) सार्वजनिक धोरण जाहीर करणें अगर सार्वजनिक कृत्यासंबंधि वचन देणें अगर-निवडणुकीच्या हक्काशीं ढवळाढवळ करण्याचा इरादा न बाळगतां-एकादा कायदेशीर हक्क नुसतां चालावेणें, हें या कलमाच्या अर्थाप्रमाणें ढवळाढवळ ह्मणून समजण्यांत येणार नाहीं.

३ तोतयेपणा, ह्मणजे, एकाद्या उमेदवारानें अथवा, आपणाकरितां कोणी काम करीत आहे हें माहीत असून त्याच्याकडे उमेदवार डोळेझांक करीत आहे,

**तोतयेपणा** अशा त्रयस्थ इसमानें एकाद्या इसमाकडून दुसऱ्या कोणाहि जिवंत अगर मयत इसमाच्या नांवानें अगर काल्पनिक [Fictitious] नांवानें मतपत्रिका मिळण्याबद्दल, अगर ज्यानें एकाद्या निवडणुकींत एकदां मत दिलें

आहे अशा इसमाकडून त्याच निवडणुकींत आपल्या स्वतःच्या नांवे मतपत्रिका मिळविण्याबद्दल अर्ज करविणें अगर करण्यास मदत करणें अगर करविण्याचा प्रयत्न करणें.

४ एकाद्या उमेदवारानें अगर, आपणाकरितां कोणी काम आहे हें माहीत असून त्याच्याकडे तो उमेदवार डोळेझांक करीत आहे अशा, त्रयस्थ इसमानें एखाद्या उमेदवाराच्या वैयक्तिक चारित्र्याच्या अगर वागणुकीच्या संबंधि अगर उमेदवारीच्या अगर उमेदवारी परत घेण्याच्या संबंधि अगर जी खोटी आहे व जी खोटी आहे ह्मणून त्याची खात्री आहे ( Believes ) अगर जी खरी असल्याबद्दल त्याची खात्री नाहीं, अशा गोष्टीचें अगर बाबीचें विधान, अशा उमेदवाराच्या निवडणुकीवर अनिष्ट परिणाम घडून येण्यास पुरेसें ( Reasonable ) होईल असें, प्रसिद्ध करणें.

खोटें विधान प्रसिद्ध करणें

## भाग २ रा

१ जो उमेदवार नाहीं अगर एजंट नाहीं अगर आपल्याकरितां काम करीत आहे हें माहीत असून त्याच्याकडे वरील दोघे डोळेझांक करीत आहेत अशा असा त्रयस्थ इसम नाहीं, अशा इसमानें केलेलें भाग १ यांत निर्देश केलेलें कोणतेंही कृत्य.

कृत्य

२ कोणत्याहि निवडणुकींत कोणत्याहि इसमानें कोणत्याहि जिवंत अगर मयत अगर काल्पनिक इसमाच्या नांवचें मतपत्रिकाबद्दल अगर अशा निवडणुकींत आपण स्वतः पूर्वीच मत दिलें असून पुनः स्वतःच्या नांवचें मतपत्रिकेबद्दल अर्ज देणें.

तोतयेपण

३ [अ] एकाद्या इसमानें उमेदवार ह्मणून उभें राहण्याकरितां अगर न राहण्याकरितां अगर उमेदवारी परत घेण्याकरितां, अगर

[ब] कोणाहि इसमानें स्वतःकरितां अगर दुसऱ्या कोणाहि इसमाकरितां मत देण्यासाठीं अगर मत देण्यापासून अलिप्त राहण्यासाठीं अगर एकाद्या मतदारानें मत द्यावें अगर न द्यावें अगर एकाद्या उमेदवारानें आपली उमेदवारी परत घ्यावी ह्मणून त्याचें मन वळविण्याकरितां अगर मन वळावें ह्मणून प्रयत्न करण्याकरितां,

हेतू [ Motive ] म्हणून असो अगर बक्षिस म्हणून असो, कोणतीहि देणगी घेणें अगर घेण्याचा करार ( Agreement ) करणें.

४ एकाद्या मतदारानें आपलें मत देण्याकरितां एकाद्या ठिकाणीं जाण्यास अगर परतण्यास लागणारा वाहनखर्चाबद्दलचा पैसा कोणाहि इसमास देणें अगर देण्याबद्दल वचन देणें.

**वाहन खर्च**

५ नेहमीं भाड्यानें देण्याकरितां ठेवलेलीं अगर भाड्यानें उतारूंची वाहातुक करण्याकरितां ठेवलेलीं कोणतीहि नांव अगर वाहन अगर प्राणी निवडणुकीच्या कारणाकरितां भाड्यानें घेणें, गुंतविणें, उसनवार घेणें अगर त्याचा उपयोग करणें.

मात्र, इतकेंच कीं, कोणाहि मतदारानें आपलें मत नमूद करण्याच्या ठिकाणीं जाण्याकरीतां अगर तेथून परत येण्याकरितां स्वतःच्या मालकीची एखादी नांव, वाहन अगर प्राणी, भाडें घेऊन, वापरण्यास देण्यास हरकत नाहीं.

६ एकादा उमेदवार अगर त्याचा निवडणुकीचा एजंट याखेरीज अन्य इसमानें, असा उमेदवार निवडून येण्यास अगर त्याच्या निवडणुकीस मदत व्हावी म्हणून, असा खर्च करण्यास त्या उमेदवारानें लेखी दिलेल्या अधिकारपत्राशिवाय एकादि सार्वजनिक सभा भरविण्याकरितां अगर एकादि जाहिरात अगर प्रसिद्धिपत्र (Circular) अगर छापिल मजकूर (Publication) प्रसिद्ध करण्यासाठीं अगर कोणत्याहि अन्य कारणासाठीं खर्च करणें अगर खर्च करण्यास अधिकार देणें.

**अनाधिकारानें खर्च करणें**

७ जेथें सर्व लोकांस अमली दारू विकली जाते अशी कोणतीहि इमारत, खोली अगर दुसरी जागा, यांचा मंडळी जमविण्याची जागा ( Committee Room ) या नात्यानें उपयोग करण्याकरितां अगर ज्या सभेंत मतदारांना येण्यास परवानगी आहे अशा सभेच्या कारणाकरितां भाड्यानें घेणें अगर देणें अगर वापरणें.

**दारूचे गुत्ते भाड्यानें घेणें**

८ मुद्रक व प्रकाशक यांचें नांव व पत्ता ज्याच्या मुखपृष्ठावर नाहीं, असें निवडणुकीसंबंधीचें कोणतेंहि पत्रक अगर जाहीरात ( Placard or Poster ) प्रसिद्ध करणें.

**हस्तपत्रकें प्रसिद्ध करणें**

# परिशिष्ट ३ रें

नियम नंबर ९ (ड) (१)

## विचित्रगड तालुका

भाग अ, शिरवळ विभाग, साऱ्याचे प्रमाण रु. ८ यांत येणारीं गांवें :—

१ शिरवळ (मुजेरी) २ शिरवळ (मोहतर्फा) ३ सांगवी ४ केंसुर्डी ५ कवठे ६ पारगांव ७ बावडें ८ मादवडें ९ येळके १० गुणंद ११ तोंडल १२ वाठार १३ भांबवडें १४ भादे १५ रुई १६ मिर्जे एकूण गांवें १६

भाग आ, उत्रवली–अंबवडे भाग, साऱ्याचे प्रमाण रु. ६ यांत येणारीं गांवें:—

१ उत्रवली २ वडगांव ३ भाबवडी ४ हातनोशी ५ खानापूर ६ निळकंठ ७ गोकवडी ८ नेरे ९ बालवडी १० आंबाडे ११ पाले १२ वरोडी बु॥ १३ वरोडी खु॥ १४ वरोडी (डायमुख) १५ पळपोशी १६ धावडी १७ बाजारवाडी १८ नाझरे १९ जानावळे २० घेरा किल्ले विचित्रगड २१ जानावळे २२ वेनवडी २३ पोपर्डी २४ शिरवली २५ अंबेघर २६ नाटंबी २७ चिखलवडे २८ कारंजे २९ सांगवी ३० अंबवडे ३१ पानवहाळ ३२ कारी ३३ रावडी ३४ चिखलगांव ३५ तिटेघर ३६ वडतुंबी ३७ कोर्ले ३८ म्हाकोशी ३९ वावेघर ४० कानावड ४१ अंगसोळे ४२ बाठेवाडी ४३ पडघळ एकूण गांवें ४३

भाग इ, हिरडोशी भाग, साऱ्याचें प्रमाण रु. ४ यांत येणारीं गांवें :—

१ मांवटमाळ २ साळव ३ रायरी ४ दापकेघर ५ धानवली ६ पऱ्हर खु॥ ७ पऱ्हर बु॥ ८ निवंगण ९ गुठे १० माझेरी ११ शिरवली १२ कुडली खु॥ १३ कुडली बु॥ १४ दुर्गाडी १५ शिरगांव १६ उंबरगणी १७ अभेपुरी १८ उंबर्डे १९ अशिंपि २० शिळिंब २१ कुंड २२ राजिवडी २३ कारंगण २४ वारवंड २५ धामुणशी २६ हिरडोशी २७ कोंढरी २८ वेणुपुरी २९ देवघर ३० म्हसर बु॥ ३१ म्हसर खु॥ ३२ आळंदे ३३ इंगवली ३४ संगमनेर ३५ सांगवी ३६ येवली ३७ भोलावडे ३८ किवत ३९ गवडी ४० शिंद ४१ नांद ४२ बाळ्मगघर ४३ महुडे खु॥ ४४ महुडे बु॥ ४५ भागुमदरा ४६ विसावे ४७ वाठार ४८ नांदगांव ४९ आपटी ५० करंजगांव ५१ निगुडघर ५२ भावेखल

एकूण गांवें ५२

## राजगड तालुका

भाग अ, शिवगंगा नदीच्या पूर्वेकडील भाग, साऱ्याचें प्रमाण रुपये ८ यांत येणारीं गांवें:—

१ करंदी (खेडेबारे) २ कासुर्डी (खेडेबारें) ३ कासुर्डी गुंजणमावळ ४ कापुरव्हाळ ५ खडकी ६ तेलवडी ७ दिवळे ८ देगांव ९ धांगवडी १० नसरापूर ११ नायगांव १२ निगडे १३ मोहरी खु. १४ मोहरी बु. १५ रांझे १६ वर्ये खु. १७ वर्ये बु. १८ वेळू १९ शिंदेवाडी २० सारोळे २१ ससेवाडी २२ हरिश्चंद्री एकूण गांवें २२

भाग आ, शिवगंगानदीच्या पश्चिमेकडील भाग, साऱ्याचें प्रमाण रु. ४ यांत येणारीं गांवें:—

१ अडौली (गुंजणमावळ) २ अडौली (खेडेबारे) ३ असनी दामगुडा ४ असनी मंडजा ५ अस्कवडी ६ अंबवणे ७ करंजवणे ८ कांबरे खु. ९ कांबरे बु. १० कांजळे ११ कुसगांव १२ कुरुंजी १३ कुरंगवडी १४ कुंबळे १५ केतकवणे खु. १६ केतकवणे बु. १७ कोदवडी १८ कोळवडी १९ खुळशी २० खोपी २१ गुंजवणे २२ गुहिणी २३ घावर २४ चांदवणे २५ चिंचले बु. २६ चिंचले खु. २७ जांभळी २८ चिरमोडी २९ डेरे ३० तांभाड ३१ दादवडी ३२ दिडघर ३३ देवगाल ३४ निघान ३५ निगडे ३६ पिंपरी ३७ पाली खु. ३८ पाली बु. ३९ पारवडी ४० फगशी ४१ बोरावळे ४२ बोपे ४३ भागीनघर ४४ भांडूवली ४५ मुतुंडे ४६ मळे ४७ माळेगांव ४८ मार्गासनी ४९ मांगदरी ५० मेरावणे ५१ लव्ही खु. ५२ लव्ही बु. ५३ वडगांव ५४ वाजेघर खु, ५५ वाजेघर बु ५६ वीरवाडी ५७ सावर ५८ सुरवाड ५९ सोंडेहिरोजी ६० सोंडेमाथना ६१ सोंडे कार्ला ६२ सोंडे सरफळा ६३ सोनवडी ६४ साखडे ६५ सांगवी खु. ६६ सांगवी बु. ६७ हातवे खु. ६८ हातवे बु. एकूण गांवें ६८

भाग इ. वेळवंड खोरे विभाग, साऱ्याचें प्रमाण रु. ३ यांत येणारीं गांवें:—

१ अस्कवडी २ करनवडी ३ करंदी खु. ४ करंदी बु. ५ कोंडगांव ६ गोरड ह्मशिवली ७ जयतपाड ८ जोगवडी ९ डेहेण १० नेळे ह्मशिवली ११ नऱ्हे १२ नानावळे १३ नांदघुर १४ पसुरे १५ पांगारी १६ बसरापूर १७ बारे खु. १८ बारे बु. १९ ब्राह्मणघर २० माजगांव २१ ह्माळवडी २२ राजघर २३ लव्हेरी २४ वांकंबे २५ वाढाणे २६ वेळवंड २७ साळुंगण २८ सांगवी २९ हार्णस. एकूण गांवे २९

## प्रचंडगड तालुका

साऱ्याचें प्रमाण रु. ४ तालुक्यांतील सर्व गांवे :—

१ धामणव्हाळ २ उगवली ३ कोळोशी ४ गडले ५ मुगांव ६ साखरी ७ भोयणी ८ वडवली ९ दासवे १० पडाळघर ११ अडमाळ १२ पळसे १३ कोशीमघर १४ भालवडी १५ चिखली खु॥ १६ पोळे १७ कसेडी १८ घोडखल १९ माणगांव २० टेकपोळे २१ गोंडेखल २२ कुर्नवडी २३ चांदर २४ खानु २५ दापसरे २६ घोळ २७ महुरी २८ निवी २९ धीसर ३० गेवंडे ३१ कोलंबी ३२ पासलि ३३ शेनवडी ३४ घेराकिल्ले प्रचंडगड ३५ निगडे [मोस खोरे] ३६ केळद ३७ पिशवी ३८ गुगुळशी ३९ मोर्डी ४० एकलगांव ४१ करनवडी ४२ पांगारी ४३ सिंगापूर ४४ हारफुड ४५ वरोती बु॥ ४६ वरोती खु॥ ४७ माजगांव ४८ बालवडी ४९ तव ५० भेंवटमाळ ५१ धडवली ५२ पायरगांव ५३ मोसे खु॥ ५४ मोसे बु॥ ५५ साईव खु॥ ५६ साईव बु॥ ५७ वरसगांव ५८ चिखली बु॥ ५९ कुरण बु॥ ६० डावजे ६१ कातवडी ६२ अंबेड ६३ निगडे [गुंजणमावळ] ६४ ओसाडे ६५ रुळे ६६ रानवडी ६७ कुरण खु॥ ६८ वांजळवाडी ६९ कादवे ७० विंडली ७१ पानशेत ७२ कुरवटी ७३ वडघर ७४ आंबेगांव खु॥ ७५ आंबेगांव बु॥ ७६ गिवशी ७७ घोलपघर ७८ शिरकोली तर्फ १ ७९ शिरकोली तर्फ २ ८० कांबेगी ८१ घोडशेत ८२ ठाणगांव ८३ कातवडी ८४ कोळवडी ८५ खांबवडी ८६ मालवली ८७ लाशिरगांव ८८ दापोडे ८९ सोंडगांव ९० खामगांव ९१ रांजणे ९२ पाबे ९३ हिरफोडी ९४ कोंढावळे खु॥ ९५ कोंढावळे बु॥ ९६ वानेप ९७ विहिर ९८ चापेट ९९ बोपलवर १०० कानंद १०१ वेले बु॥ १०२ वेले खु॥ १०३ वामगवर १०४ खोडद १०५ खरीव १०६ वांजळे १०७ कोंढवली. एकूण गावे १०७

## पवनमावळ तालुका

साऱ्याचे प्रमाण रु. ८ सर्व गांवें :—

१ कोळवण २ हाडशी ३ जोवन ४ काशीग ५ भालगुडी ६ अंबळे ७ खांबोली ८ पिंपळोली ९ जवळ १० साठेसाई ११ नांदगांव १२ चिखलगांव १३ वाळेग १४ होनले १५ नाणेगांव १६ पिरंगुट १७ उरवडे १८ कासारअंबोली १९ करमोळी २० मुगवडे २१ चाले २२ दखणे २३ कुळे २४ सावरगांव २५ मुठे २६ माळेगांव २७ अंदगांव २८ वांजळे २९ खरावडे ३० बातुंडे ३१ कोळावडे ३२ लवार्डे

३३ वेडे ३४ भोडे ३५ टेंमघर ३६ वेगरे ३७ जातेड ३८ कोंढूर ३९ तिकोना ४० अजिवली ४१ वाघेश्वर ४२ शिळीम ४३ कादव ४४ गेवंडे ४५ चावसर ४६ मोरवे ४७ केवरे ४८ ठाकूरसाई ४९ फागणे ५० मानगांव ५१ तुंग ५२ पानखुली ५३ कोळे चाफेसर ५४ घेराकिल्ले तुंग ५५ कोथुर्णे ५६ वारु ५७ मळवंडी ५८ ओवळे ५९ दिवड ६० अडले बु॥ ६१ डोणे ६२ पिंपळखुंटे ६३ ओझर्डे ६४ धानगव्हाण ६५ ब्राह्मणोली ६६ एलखोल. एकूण गांवे ६६

## सुधागड तालुका

साऱ्याचें प्रमाण रु. ८ सर्व गांवें: —

१ पाली २ घेराकिल्ले सरसगड ३ दापोडे ४ वावे ५ आंबवले ६ बुरमाळी ७ झाप ८ रासळ ९ विडसई १० वाफेघर ११ खवली १२ सिद्धेश्वर १३ पुई १४ आपटवणें १५ सिद्धेश्वर खु॥ १६ वावळोली १७ मार्जे १८ आंबवली १९ मढाळी २० उसर २१ अडुळसे २२ पोटलज २३ गुगुळवाडा २४ गोंढाळें २५ नांदगांव २६ पोटलज खु॥ २७ बल्हे २८ गोमाशी २९ नागशेत ३० नागांव ३१ पिंपळोली ३२ नेणवली ३३ खडसांबळे ३४ कळंबोशी ३५ अतोणें ३६ पाच्छापूर ३७ किल्ले सुधागड ३८ खांडसाई ३९ धोंडसे ४० नाडसूर ४१ कोंडगांव ४२ वांद्रोशी ४३ आंबेगांव ४४ कानीवली ४५ तीवरे ४६ नवघर ४७ धडेवली ४८ असरे ४९ करचुंडे ५० खिस्तवड ५१ पेडली ५२ कानसळ ५३ हेदवली ५४ मुळशी ५५ कळंव ५६ हरनेरी ५७ वराडजांभुळपाडा ५८ घोटवडे ५९ वासोंडे ६० भेलीव ६१ सावे ६२ माणगांव बु॥ ६३ माणगांव खु॥ ६४ फल्याण ६५ वावे ६६ परळी ६७ चंदरगांव ६८ दहिगांव ६९ आमनेरी ७० गोंदाव ७१ नाणोसे ७२ ढोकशेत ७३ हातोंड ७४ पढघवली ७५ उद्धर ७६ आवंढे ७७ महागांव ७८ पडमरे ७९ खांडपोली ८० ताडगांव ८१ कवेले ८२ कुंभारघर ८३ वाघोशी ८४ जांभुळपाडा ८५ भेरव ८६ मिळपाडा ८७ चिवे ८८ उसाळे ८९ करंजघर. एकूण गांवें ८९

# परिशिष्ट ४ थें

## साक्षरता अगर देशी भाषेच्या ४ इयत्तेच्या शिक्षणाबद्दलचें सर्टिफिकिट

सर्टिफिकिट देण्यांत येतें कीं, रा. रा. राहणार

मौजे तालुके | यास लिहितां वाचतां येते, / याची भाषेच्या चवथ्या इयत्तेच्या

मगदुराचें शिक्षण झालें आहे. तारीख माहे सन १९४ इसवी.

सही

### काउन्टर सही

वरील सर्टिफिकिटांत लिहिलेला मजकूर बरोबर आहे अशी मी आपली खात्री करून घेतली आहे. ता. माहे सन १९४ इ.

मामलेदार, तालुके.................

टीपः- (१) चवथ्या इयत्तेच्या मगदुराच्या शिक्षणाच्या सर्टिफिकिटावर तालुका मामलतदार, अव्वल कारकून, शाळाधिकारी, हेडमास्तर व हेडमिस्ट्रेस, सरकारसंमान्य खाजगी शाळेचे हेडमास्तर यांपैकीं कोणीहि सही करून हें सर्टिफिकेट द्यावे.

(२) साक्षरतेबाबतच्या सर्टिफिकिटावर वरील अधिकारी अगर गांवकामगार ( पाटील व कुळकर्णी अगर तलाठी ) यांपैकीं कोणीहि सर्टिफिकिट द्यावे.

मात्र, गांवकामगार पाटील अगर कुळकर्णी अगर तलाठी यांचे सर्टिफिकिटावर तालुका मामलतदार यांची काउन्टरसिग्नेचर ( सर्टिफिकेटमधील मजकूर बरोबर असल्याविषयी खातरजमेदाखल सही ) अवश्य असली पाहिजे.

# परिशिष्ट ५ वे.

नियम [ १८ ] [ इ. ]

## नेमणुकीच्या कागदाचा नमुना

### नेमणुकीचा कागद

ज्या मतदारसंघाकरितां नेमणूक केली आहे, त्याचें नांव

उमेदवाराचें नांव

बापाचें नांव

वय

जात

पत्ता

मतदार म्हणून ज्या मतदारसंघाच्या मतदारांच्या यादींत उमेदवाराचें नांव नोंदलें आहे, असा मतदारसंघ.

ज्या मतदारसंघांत मतदार म्हणून ज्याचें नांव नोंदलें आहे, त्या यादींतील उमेदवाराचा अनुक्रम नंबर

सुचविणाराचें नांव

मतदारसंघाच्या यादींतील सुचविणाराचा नंबर

सुचविणाराची सही

अनुमोदन देणाराचें नांव

मतदारसंघाच्या यादींतील अनुमोदन देणाऱ्याचा नंबर

अनुमोदन देणाराची सही

### उमेदवाराचा प्रतिज्ञालेख

मी याअन्वयें असें कबूल करतो कीं, ही नेमणूक मला कबूल आहे

तारीख | उमेदवाराची सही

[ निवडणूक कामगार अगर दुसरा अधिकृत इसम यानें भरणेचा ]

### पोंच झाल्याबद्दलचा दाखला

हा नेमणुकीचा कागद मला माझे कचेरींत ता ......... ......... ....इसवी रोजीं वाजतां पोंचला.

अनुक्रम नंबर

निवडणूक कामगार अगर
दुसरा अधिकृत इसम

## छाननीचा दाखला

हा उमेदवार, त्याचे नांव सुचविणारा व त्यास अनुमोदन देणारा यांच्या निवडणुकीसंबंधीं लायकीची मी छाननी केली व ते, अनुक्रमे, उभे राहण्यास, नेमणूक सुचविण्यास व तिला अनुमोदन देण्यास लायक आहेत असें मला आढळून आलें आहे.

तारीख

निवडणूक कामगार अगर दुसरा
अधिकृत इसम

टीपः— हा नेमणुकीचा कागद निवडणूककामगार अगर त्यानें अधिकृत केलेला दुसरा इसम यांजकडे त्याचे कचेरीत तारीख रोजीं दुपारी ४ वाजण्यापूर्वीं जर दिला नाहीं, तर तो कायदेशीर दिला असें होणार नाहीं.

छाननीची तारीख वेळ व जागा याची समज

नेमणुकीच्या अर्जाची छाननी...........वार तारीख..........माहे.... .... सन...... रोजीं सकाळीं दुपारीं वाजतां आपलें ऑफीसमध्यें होणार आहे हे मला समजलें. तारीख मा. सन. इ.

उमेदवार अगर
सुचविणारा व अनुमोदन देणारा

---

# परिशिष्ट ६ वे

( नियम १८ )

नमुना नंबर १

मतपत्रिका, पुढील बाजू

| स्थळ प्रत | उमेदवाराचे नांव व चिन्ह | फुली |
|---|---|---|
| अनुक्रम नंबर<br>मतदारसंघ<br>मतदानकेन्द्राचें नांव अगर नंबर<br>यादींतील मतदाराचा नंबर<br>मतदाराची सही अथवा आंगठ्याचा ठसा | | |

**टीपः**— मतपत्रिकेच्या बाहेरील बाजूचा सर्व भाग, उमेदवारांची नांवें व चिन्हें असलेल्या कोरटी व मतें नमूद करण्याच्या जागा यांनी व्यापला जाणे ही गोष्ट महत्वाची आहे.

मतपत्रिकेची मागील बाजू

सूचनाः—

१ तुह्मास, ज्या मतदानस्थानाच्या यादींत तुमचें नांव असेल, त्याच मतदानस्थानीं मत देतां येईल.

२ ज्या उमेदवारास मत देण्याची इच्छा असेल, त्या उमेदवाराच्या नांवापुढें × अशी फुली करा.

३ मतपत्रिकेवर, तुह्मास जितकी मतें असतील, त्यापेक्षां तुह्मी ज्यास्त फुल्या करतां कामा नयेत.

४ तुह्मास तुमची मतें प्रत्येक उमेदवारास एक याप्रमाणें अथवा कोणत्याही एका उमेदवारास सर्व मतें याप्रमाणे देतां येतील.

अनुक्रम नंबर.

## भोर संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ

नमुना नंबर २ [ नियम ३९ ]

### देऊं केलेल्या मतांची यादी

### मतदानस्थान

| मतदारसंघाचें नांव<br>१ | मतदाराचें नांव<br>२ | मतदाराच्या यादीतील नंबर<br>३ | नमूद केलेल्या मतांची संख्या<br>४ | मतदाराची सही अगर निशाणी अंगठा<br>५ |
|---|---|---|---|---|
| | | | | |

नमुना नंबर ३ [ नियम ४० ]

### वादग्रस्त मतांची यादी.

| मतदाराच्या यादीतील नंबर<br>१ | नांव<br>२ | मतदार साक्षर असल्यास, त्याची सही व निरक्षर असल्यास, आंगठ्याची निशाणी<br>३ | ओळख सांगणारा इसम असल्यास, त्याचें नांव<br>४ |
|---|---|---|---|
| | | | |

## परिशिष्ट ७ वे

[ नियम ४२ ]

सरकारी नोकरास, त्यास ज्या ठिकाणीं आपलें मत नोंदतां येईल, त्याखेरीज इतर ठिकाणीं निवडणुकीचें कामावर नेमिले असल्यास, त्या ठिकाणीं मत नोंदण्याबाबत परवानगीचा कलेक्टर याचा दाखला

[ अ ] [ ब ] हा... तालुक्याच्या मतदारसंघांतील.... नंबरचा मतदार आहे. त्यास........संघाचा पोलिंग ऑफिसर अगर प्रमुख अंमलदार नेमण्यांत आले आहे. म्हणून, त्या पोलिंग–स्टेशनच्या ठिकाणीं त्यास आपलें मत नोंदण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

तारीख ........कलेक्टर, संस्थान भोर

---

## परिशिष्ट ८ वें

## निवडणुकीसंबंधीं कागदांच्या फीबद्दल

( नियम ५४ )

या नियमान्वयें निवडणुकीसंबंधें खुलें ठेवलेल्या कागदपत्राच्या नकला करून देण्याचे झाल्यास, नकला मागणाऱ्या इसमाकडून खालीं दिलेल्या दरानें फी वसूल केली पाहिजे:

१ उमेदवारानें दिलेलें खर्चाचें पत्रक व त्यासंबंधीं प्रतिज्ञापत्रक........रु. १

२ निवडणुकीसंबंधीं जें जें कागदपत्र या नियमान्वयें खुलें ठेविलें जातील, ते पाहण्यास दर तासास अगर त्याचे भागास..............................रु. १

टीप:— कागद पाहण्याची फी आगाऊ घेतली पाहिजे.

३ कागदपत्राच्या नकलांची फी :

(अ) नक्कल करण्याची फी : प्रत्येक १०० शब्दास अगर त्याचे भागास ८२ आणे, व तक्त्याच्या नकलेस ८४ चार आणे.

(ब) रुजुवात फी: (अ) कलमांत सांगितलेल्या दराच्या निम्मे.
मात्र, ही फी रु. १ पेक्षां जास्त घेतां कामा नये.

(क) कागदाची किंमत: छापिल फार्मवर नक्कल असल्यास, ३ पै; साध्या कागदावर असल्यास, ६ पै.

४ नकलेकरितां करण्याच्या अर्जासोबत रु. २ फीकरितां पाठविलें पाहिजेत; त्यापेक्षा कमी खर्च लागल्यास, बाकी परत केले पाहिजेत; व जास्त लागल्यास, नक्कल देण्यापूर्वी ते वसूल केले पाहिजेत.

---

## परिशिष्ट ९ वें

(नियम २६)

### निवडणुकीबाबतच्या खर्चाच्या पत्रकांत द्यावयाचा तपशील

निवडणुकीस उभा राहिलेल्या उमेदवारानें निवडणुकीच्या निकालानंतर दोन महिन्याचें आंत निवडणुकीसाठीं झालेल्या खर्चाचें जें पत्रक निवडणूककामगार यांजकडे सादर करावयाचें, त्यांत खाली दिलेल्या खर्चाच्या रकमा तपशिलाप्रमाणें नमूद केल्या पाहिजेत.

जमेच्या सदरांत प्रत्येक इसम, उमेदवारासुद्धां, क्लब व संस्था अथवा मंडळी, ज्या ज्याकडून निवडणुकीकरितां प्रत्यक्ष रोख रकमा, सिक्युरिटी किंवा तितक्या पैशाचा

---